
# अमृत कुंभ



वर्ष १७ | अंक १ | एप्रिल - मे २०२३ | मूल्य रु. १४/-



वाशी (नवी मुंबई) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्ज्वलन करताना राजयोगिनी ब्र.कु. संतोषदीदी, नगरसेविका शिल्पा मोरे, CRPF CEO इंद्राणी यादव, ब्र.कु. शीला, ब्र.कु. माला



अकोला : कथाकार भ्रा. भागवत देशमुख यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. वैशाली व ब्र.कु. रागिणी



पिंपरी (पुणे) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आदर्श महिला गौरव पुरस्कार प्राप्त करताना ब्र.कु. सुरेखा



पूर्णा (परभणी) : सेवाकेंद्राला भेट दिल्यानंतर श्री १००८ महंत जीवनदास यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. प्रणिता



चिखली (बुलढाणा) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, पहिली महिला सर्पमित्र वनिता बोराडे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. उर्मिला, ब्र.कु. सुरेखा



सांगवी (पुणे) : आमदारपदी निवड झालेल्या श्रीमती अश्विनीताई जगताप यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. संजीवनी

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १७, अंक १. एप्रिल – मे २०२३




१. संपादकीय – मरजीवा म्हणजे काय ? २
२. दादी गुलजार – सदैव निर्विघ्न, निश्चिंत, दृढनिश्चयी ४
३. प्रकाशवाटा (भाग – ३) ५
४. दिव्य बुद्धीधारी भ्राता जगदीशजी ! ६
५. पसायदान (भाग – १) १०
६. महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकांची मानसिकता बदलावी लागेल १२
७. जपान डायरी (भाग – ३) १४
८. कर्मेन्द्रियांचा दरबार (एक नाटिका) १७
९. ''शिवबाबा : माझा पाठीराखा'' (भाग – २) १९
१०. परीकथा (भाग – ८) २०
११. खुदा दोस्त २२
१२. बी पॉजिटिव्ह अर्थात ''सकारात्मक बना'' २३
१३. शिवबाबांचा चमत्कार २५
१४. बाबा, परत येशील का? २५
१५. प्रश्नोत्तरे (भाग – १) २७


### मुखपृष्ठाविषयी

योगशास्त्रात अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा इत्यादी सिद्धींचे वर्णन पहावयास मिळते. जेव्हा पाहिजे तेव्हा शरीराचे अणुसमान लघुरूप करणे, हनुमंतासारखे शरीर भव्य करणे, भेदिले सूर्यमंडळा करणे, वायुसमान हलके करणे अशा मुख्य आठ सिद्धींचे वर्णन आढळते. हे झाले प्रकृतीच्या पाच तत्त्वांनी बनलेल्या शरीरासंबंधीच्या सिद्धींचे गुणगान. मात्र परमपिता शिव परमात्मा येऊन राजयोग शिकवतात त्यात स्थूल नेत्रांनी दिसणाऱ्या शरीराचा विसर पडावा आणि ज्ञानचक्षुंनी आत्मज्योत पहावी हे स्पष्ट केले आहे. या द्वारे सिद्धी म्हणजेच शक्ती प्राप्त होते. राजयोगाभ्यासाने मन–बुद्धीवरील पूर्व कर्मांचे ओझे हलके होते. नित्य आनंदी जीवन होते हे या चित्रातून अभिप्रेत आहे.

– प्रकाशिका


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com




**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२



**Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints, 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.**

**वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,५००/–, एका अंकाचे रु. १४/–**

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



(ब्रह्मावत्सांसाठी)

संपादकीय ...

# मरजीवा म्हणजे काय ?

**'मोती उपजे सीप में**
**सीप समुंदर माहि**
**कोई मरजीवा काढेसी**
**जीवन की गम नाहि'**

कबीर एका ठिकाणी असे सांगून गेले आहेत. या दोह्याचा अर्थ आहे - शिंपल्यात मोती तयार होतो, शिंपला समुद्राच्या तळाशी बसलेला असतो. ज्याची जीवावर उदार होऊन काहीतरी करायची इच्छा आहे त्यालाच हाती मोती लागू शकतात. एखाद्या पाणबुड्याला जीवाचे भय असेल, तर त्याने मोती मिळवण्याची आशा बाळगूच नये. असंच काहीसे अध्यात्मात आहे. एकदा या मार्गाने पुढे जायचे ठरविल्यावर मागे-पुढे पहायचे नाही, कितीही बाधा येवोत; पण मागे हटायचे नाही आणि निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ याप्रमाणे मार्गक्रमण करत राहायचे. अशा व्यक्तीस 'मरजीवा' म्हणता येईल. पण त्याहीपेक्षा सखोल अर्थ या शब्दामागे दडला आहे. त्या अर्थाच्या खोलात जायचा आज प्रयत्न करू या.

माणूस ज्या घरात किंवा कुळात जन्माला येतो त्या घरातील चाली-रीती, आई-वडिलांचे संस्कार, त्यांची पत सांभाळण्याचे शिक्षण घेत तो मोठा होतो. समजूतदार असेल, तर तो कुळाचे नाव वृद्धिंगत करायचा प्रयत्न करतो. नावलौकिकाला बट्टा लागणार नाही ना याची खबरदारी घेतो. जीवन-मृत्यूच्या क्रमानुसार मनुष्यात्मा नवीन जन्म घेतो तेव्हा मागील जन्मातील स्मृती लोप पावतात. नवीन जन्मातील नवे आई-वडील, शिक्षक, गुरु, मित्र-परिवार सगळंच नवं होऊन जातं. अगदी यासारखेच आहे या जन्मात अध्यात्माच्या वाटेवर चालायचे असेल तर! ब्रह्माकुमारीजमध्ये शिकवले जाणारे, शिवपित्याचे ज्ञान प्राप्त झाल्यावर जेव्हा आध्यात्मिक वाटचाल सुरू होते, तेव्हा जुने सगळे विसरून जाऊन नवीन वाटचाल सुरू करणे हाच उन्नतीचा मार्ग आहे. 'जुने म्हणजे काय?' आपले आजपर्यंतचे विषयविकार, त्यानुसार अंगी असलेल्या सवयी आणि त्यातून बनलेला स्वभाव या सगळ्याचा प्रभाव आपल्या मन-बुद्धी आणि संस्कारावर असतो. ते सगळं मालवत जावं आणि जे आत्म्याचे मूळ गुण आहेत ते जागृत व्हावे यासाठीच राजयोगाचा अभ्यास शिकवला जातो. जसे देह बदलल्यावर नवे संस्कार जागृत होतात तसे याच जन्मात संस्कार परिवर्तन असे व्हावे जेणेकरून बघणाऱ्याला वाटावे याचा पुनर्जन्मच झाला आहे. हेच ते 'मरजीवा' बनणे आहे. आपले विचार आणि कर्म ज्ञानयुक्त होत जाणे, किंवा इतरांना सुखकारक आणि प्रेरणादायक बनत जाणे म्हणजे मरजीवा अशीही एक व्याख्या करता येईल.

जेव्हा एखादा माणूस संन्यास घेतो तेव्हा प्रथेनुसार त्याचे बाह्यरूप आधी बदलते आणि मग अंतरंग बदलते किंवा बदललेले अंतरंग हळूहळू प्रकट होऊ लागते. अनेक संन्यासी मुंडन करतात तर कुणी दाढी आणि डोक्यावरचे केस वाढवतात, भगवी किंवा श्वेत वस्त्रे धारण करतात. जीवनात काही नियम कायमस्वरूपी स्वीकारतात. ज्याच्या - त्याच्या रुचीप्रमाणे जो-तो या गोष्टी अंगीकारतो. रामकृष्ण परमहंसांसोबत असणाऱ्या दहा-बारा शिष्यांना घेऊन एके दिवशी विवेकानंदानी अग्नीसमोर प्रतिज्ञा करविली. कुणीही संन्यस्त मार्गावरून आजीवन ढळणार नाही याबाबतची प्रतिज्ञा करविली. त्यानंतर प्रत्येकाने नाव बदलले. त्यामागचे कारण होते- 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' या केशवसुतांच्या काव्यपंक्तीप्रमाणे आधीच्या जीवनाचे पडसाद पुढील वाटचालीवर होऊ न देणे.

राजयोगाच्या साधकांनाही अशाच प्रकारे साधना करायची असते. पण त्यासाठी घरदार सोडायची आवश्यकता नाही. मात्र वैराग्य असे हवे की घरदारच काय;

पण देहही सोडल्याप्रमाणे वैराग्य अंगी यावे हीच उच्च अवस्था आहे. ही 'मरजीवा' स्थितीची अजून एक व्याख्या करता येईल.

१) मरजीवा व्यक्तीच निरहंकारी, निरीच्छ आणि नम्रचित्त बनते – जो जीवनात पावित्र्याचे व्रत घेतो तो 'ब्राह्मण' (येथे कुणाच्या पोटी जन्म घेतल्यावर काय जात किंवा वर्ण लाभतो तो लौकिक अर्थ अभिप्रेत नाही). ज्याची कर्मे ईश्वराच्या सांगण्यानुसार आहेत तो ब्राह्मण हा अर्थ आहे. असा खराखुरा ब्राह्मण म्हणवायचे असेल, तर मरजीवा बनायचा प्रयत्न करणे हेच राजयोगी जीवनाचे उद्दिष्ट आहे. शिवपित्याच्या श्रीमतानुसार आचरण करणे म्हणजेच आपल्या बुद्धीच्या अहंकाराचा त्याग करणे होय. राजयोगी जीवनाचे लक्ष्यच आहे – लक्ष्मी–नारायणासमान संपूर्ण निर्विकारी बनणे. हाच जणू आरसा साधकाच्या समोर आहे. त्यात पाहून आपण तसे बनण्याच्या किती जवळ गेलो आहोत ते ज्याने त्याने ठरवायचे आहे. जर आपल्या सद्यःस्थितीत आणि आपल्या उद्दिष्टात अजूनही अंतर दिसत असेल तर कशाला वृथा अहंकार बाळगायचा. भौतिक इच्छांच्या मागे किती लागायचे आणि थकून जायचे ते आत्मपरीक्षणाने ठरविणे अगत्याचे आहे.

२) संपूर्ण मरजीवा बनण्यामुळे संपूर्ण स्थिती प्राप्त होते. – देह आणि देहाचे सर्व नातेवाईक, मित्र–परिवार या सगळ्यात आपली बुद्धी कितीही नाही म्हटले तरी गुंतलेली असते. त्या स्मृतींच्या जागी मनाने सर्व सबंध शिवपित्याशी जोडायचे आहेत. आजवर भक्ती करताना 'त्वमेव माता च पिता त्वमेव' म्हटले; पण शुद्ध भावनेच्या आधारे त्याचा अनुभव किती केला? असा अनुभव घेण्यासाठी शिवपित्याचा सत्य परिचय आवश्यक होता तो मिळाल्यावरच त्याच्याशी नाते–संबंध जोडता येतो. या अनुभूतीसाठी देहाची स्मृती हे मूळ आहे. देह विसरून स्वतःला आत्मभानात स्थिर करणे हीच पहिली पायरी आहे. आपल्या मन–बुद्धीची एक गंमत आहे. आधीच्या स्मृती बव्हंशी पुसल्या जातात आणि नव्या स्मृती कोरल्या जातात. तेच करायचे आहे; पण जाणीवपूर्वक. नवे संबंध एका परमात्म्याशी जोडायचे आहेत. जसे गोप–गोपिकांचे वर्णन आढळते – त्या देहभान विसरून जात. कबीर म्हणत, 'जा जमना के तीर, एक एक गोपी के प्रेम में बह गये कोट कबीर.' अशी उच्च पातळी गाठण्याचा पुरुषार्थ करण्यासाठी राजयोगमार्ग आहे.

३) शिव समर्पण – पूर्वीच्या काळी काशीस जाऊन उत्कट भक्तीच्या आवेगात काहीजण स्वतःच्या जीवाची कुरवंडी ओवाळून टाकत. देवाचे दर्शन नाही होत, तर हा देहच त्याला अर्पण करून टाकतो असा अट्टाहास असे. त्याला 'काशी कलवट खाना' असे उत्तर भारतात म्हटले जाई. इंग्रज सरकारच्या काळात यावर कायद्याने बंदी आणण्यात आली. असे देहार्पण करण्यामागे मुक्तीची कामनाही असे. पण शिव परमात्मा स्वतः येऊन जेव्हा ज्ञान देतात तेव्हा ते सांगतात असे देहार्पण करून काही जन्मांच्या पूर्वकर्माचे ओझे उतरेल; पण जन्म–मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका नाही. त्याऐवजी देह आणि देहाशी संबंधित सर्व धागे स्मृतीपटलावरून विसरून माझी म्हणजेच निराकाराची आठवण करा. याद्वारे मनोविकारांपासून मुक्ती मिळेल आणि आत्मा देवत्व पद प्राप्त करेल तीच खरी जीवन्मुक्त अवस्था आहे. तीच खरी प्राप्ती आहे.

४) जीवघात – अज्ञानवश मनुष्य दुःखाला कंटाळून किंवा जीवनातील समस्यांना घाबरून स्वहत्या करण्याचा मार्गही चोखाळतो. पण ज्ञानी आणि मरजीवा बनणारा प्रयत्नशील साधक असे ज्ञानयुक्त मरजीवा बनतो. त्यासाठी झटतो. त्याला जीवनातील समस्या विचलित करू शकत नाहीत. तो जाणतो, अशी वादळे मला पुढे नेण्यासाठीच येतात. टाकीचे घाव सोसले, तरच देवपण प्राप्त होईल. हा पोकळ आशावाद नाही, तर सत्यमार्ग आहे.

५) ज्ञानचिता की अज्ञानवश विकारचिता – ज्याच्याकडे शिवपित्याने दिलेले ज्ञान नाही तो मनुष्यात्मा विकाररूपी अग्नीचा अनुभव घेतो, तर ज्ञान प्राप्त झालेली व्यक्ती ज्ञानरूपी अग्नीने पूर्वकर्माचे ओझे उतरवते. याचे वर्णन संत ज्ञानेश्वरांनी केले आहे – ज्ञानाग्नीचेनि मुखे । जेणें जाळिली कर्मे अशेखें (सर्व)... (ज्ञाने. अ.४, ओवी १०५). जो अद्यापपर्यंत माया अर्थात पाच विकार किंवा प्रकृतीच्या आकर्षणाच्या बंधनात अडकला आहे, त्याला हे सगळं अवघड वाटू शकते. पण जो शिवपित्याच्या ज्ञानमार्गावर नेटाने चालू पाहतो त्याच्यासाठी मार्ग सुकर होत जातो. कारण परमात्मा शिव शिक्षक बनून केवळ मार्गच दाखवत नाही तर सद्गुरू बनून शक्तीही देतो.

या उहापोहानंतरही प्रश्न पडू शकतो मरजीवा

(पृष्ठ क्र.११ वर)



# दादी गुलजार - सदैव निर्विघ्न, निश्चिंत, दृढनिश्चयी

ब्र.कु. निर्वैरजी, शांतीवन

**ब्र.कु. भ्राता निर्वैरजींचा संक्षिप्त परिचय : भ्राता निर्वैरजींना ईश्वरी ज्ञानमार्गाचा परिचय १९५९ मध्ये झाला. मातेश्वरी जगदंबा यांच्या प्रेमळ सहवासाने परिसस्पर्शाचा अनुभव त्यांना झाला आणि भारतीय नौदल सेवेतून मुक्त होऊन त्यांनी आपले जीवन संस्थेस वाहून घेतले. आज ते ब्रह्माकुमारीज संस्थेचे जनरल सेक्रेटरी आहेत. त्याचप्रमाणे ग्लोबल हॉस्पिटल (GHRC) चे मॅनेजिंग ट्रस्टी व जानकी फाऊंडेशनचे व्हाइस प्रेसिडेंट आहेत. वयाची ऐंशी वर्षे पार केल्यावरही उत्साहाने कार्यरत आहेत. गुलजार दादीजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनी व्यक्त केलेले अनुभव येथे देत आहोत.**

मी जेव्हा ब्रह्माकुमारीज् ईश्वरीय विश्व विद्यालयात येऊन ज्ञान घेण्यास सुरुवात केली तेव्हापासून वेळोवेळी मी दादीजींच्या संपर्कात येत गेलो. गुलजार दादींचे प्रवचन तसेच त्यांच्याद्वारे मिळणारे दिव्य संदेश ग्रहण करत गेलो.

**सगळ्यांचे मात-पिता - बापदादा**

साकार बाबा १८ जानेवारी १९६९ ला जेव्हा देहत्याग करून अव्यक्त झाले तेव्हा एक प्रकारची उदासीनता जाणवत होती; पण २१ जानेवारी १९६९ला दादी गुलजारजींच्या देहाद्वारे अव्यक्त बापदादा मिलनची सुरुवात झाली. तेव्हापासून जाणीव झाली की बापदादा अजूनही मधुबन मध्येच आहेत आणि आपल्याला पूर्वीप्रमाणेच मार्गदर्शन करत राहतील, श्रीमत देत राहतील. तेव्हापासून आपण सर्वांनीच अनुभवले की अव्यक्त बापदादांनी गुलजार दादींद्वारा प्रत्येकाचे संगोपन केले, ज्ञानधन प्रदान करून त्याची व्याप्ती उलगडून दाखविली, दिव्य गुण आणि शक्ती यांचे महत्त्व समजावून सांगितले. दादी गुलजारजींच्या द्वारे बापदादांनी दृष्टी देऊन प्रत्येकाशी संवाद साधला आणि प्रत्येकाच्या वैयक्तिक उत्कर्षासाठी मार्गदर्शनही केले.

कलियुगाचा अंतिम काळ येऊन ठेपला आहे. ८४ व्या जन्मातील अंतिम क्षण समीप ठेपले आहेत. सर्व आत्म्यांची शक्ती लोप पावत आहे. या सर्व गोष्टी आपण जाणूनच आहोत. अशावेळी बाबांनी दादींद्वारे प्रत्येक आत्म्याला प्रेरणा देऊन हिम्मत दिली. त्याचबरोबर आपले जीवन कशाप्रकारे सर्वश्रेष्ठ बनवता येईल याचे अत्यंत सोप्या शब्दांत मार्गदर्शन केले. दादींच्या द्वारे होणाऱ्या अव्यक्त बापदादा मिलन कार्यक्रमामध्ये जेव्हा भारताबाहेरील लोक येऊ लागले तेव्हा हे सप्रमाण सिद्ध झाले की, बापदादा हे काही फक्त भारतापुरतेच मर्यादित नाहीत तर संपूर्ण विश्वाचे आहेत. बापदादांनी दादी गुलजारजींद्वारा अनेकानेक सेवा केल्या. सर्वांच्या प्रती कायमच शुभभावना ठेवणे, सहयोगाची भावना उरात बाळगणे इत्यादी हृदयस्पर्शी गोष्टी सविस्तरपणे सांगितल्या.

**झाले गेले विसरून पुढे चला**

गुलजार दादी कधी कोणती गोष्ट आपल्या मनांत ठेवत नसत. कोणीही स्वत:बद्दलच्या काही उणिवा, त्रुटी सांगितल्या, तर दादी त्यांना अत्यंत प्रेमाने दृष्टी देत असत. त्यांचा हात आपल्या हातात घेऊन धीर देत म्हणायच्या - ''सर्व काही ठीक होईल, सगळे काही चांगले, व्यवस्थित होईल. तुम्ही संपूर्णपणे निश्चिंत - निर्धास्त रहा.'' कोणाच्या मनामध्ये काही घालमेल असेल, तर दादींच्या दृष्टीद्वारे मिळणाऱ्या दैवी शक्तींमुळे तो क्षणार्धात हलका होऊन त्याच्या मनावरचे दडपण दूर होत असे. ईश्वरी सेवांमध्ये गुलजारदादींचे किती महत्त्वपूर्ण योगदान आहे हे तर आपणां सर्वांना माहीतच आहे. दादी जेव्हा दिल्ली केंद्रावरती कार्यरत होत्या तेव्हा एकाचवेळी आपल्या

(पृष्ठ क्र.१८ वर)



# प्रकाशवाटा

## (भाग – ३)

## महत्त्वाचा होकार

ब्र.कु. सुभाष, ज्ञान सरोवर, आबू पर्वत

**ब्र.कु. सुभाषभाई संस्थेच्या आबू येथील मुख्यालयात गेली अनेक वर्षे समर्पित जीवन व्यतीत करत होते. ज्ञानसरोवर येथील भोजनगृहात जेवण वाढण्याच्या सेवेत कार्यरत होते. २४ जानेवारी २०२३ रोजी त्यांनी आपला नश्वर देह ठेवला. त्यांनी आजवर केलेले विपुल स्फुट लेखन आपण अमृतकुंभच्या माध्यमातून वाचणार आहोत हीच त्यांना खरी श्रद्धांजली !**

१९८६ चा रक्षाबंधनाचा दिवस होता. राखी पौर्णिमेच्या एक आठवडा आधी मी दादी प्रकाशमणी यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी खूपच प्रेमाने समजावले, ''तू अजून खूप लहान आहेस. शिक, नोकरी कर.'' मी म्हटले, ''बरं दादीजी, जशी तुमची आज्ञा. माझी शिक्षिका बहीण (टिचर बहीण) येणार आहे. तेव्हा मी राखी पौर्णिमा करूनच मग त्यांच्या बरोबर घरी जाईन.''

दादींना माझे हे आज्ञाधारक असणे फार आवडले. राखी पौर्णिमेचा कार्यक्रम खूपच दिव्य भव्य आणि आकर्षक होता. ओम्-शांती भवनाच्या व्यासपीठावर वेगवेगळ्या प्रकारच्या राख्या अतिशय सुंदर रीतीने सजवून ठेवल्या होत्या.

मधुबनमध्ये त्या दिवशी माझा शेवटचा दिवस होता. परंतु दुसरीकडे बाबांजवळ मी हीच विनंती करत होतो, ''बाबा मला समर्पित व्हायचे आहे.'' मी राखी पौर्णिमेचा कार्यक्रमाचा योगयुक्त (बाबांच्या आठवणीने) होऊन आनंद घेत होतो. खूपच भावूक होऊन मी दादींसमोर गेलो.

मोहिनी बेननी टिळा लावला. दादींच्या समोर जाताच मला दिसले की दादीजींचे दोन्ही हात राखींनी भरलेले. (दोन्ही हातांवर राख्याच राख्या). मी दादींसमोर आपला हात धरला. दादींनी राखी बांधली आणि माझ्या हातावर आपले दोन्ही शक्तीशाली हाथ ठेवले. दादींनी हात बराच वेळ धरून ठेवले. मग एका हाताने बोटांनी इशारा करून म्हटले, ''तू कुठेही जात नाहीयेस. तुला इथेच आजपासून बाबांच्याच घरी राहायचे आहे. फक्त कुणाच्याही संगदोषात येऊ नकोस. खूप छान पुरुषार्थ कर.'' मी तर अचंबित झालो. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. मी दादींच्या हाताचे चुंबन घेतले. मी बाबांचे आभार मानण्यासाठी लगेच बाबांच्या कक्षात गेलो. ज्याची कितीतरी वर्षांपासून वाट पाहत होतो, तो माझ्यासाठी जीवनातला सर्वात आनंदाचा दिवस होता. माझी आस प्रिय बाबा आणि आदरणीय प्रकाशमणी दादींनी पूर्ण केली.

ही गोष्ट रक्षाबंधनाच्या दिवसाच्या अमृत वेळेची आहे. भोली दादीजी मोठ्या दादींकडे भोजनाचा (जेवणाचा) कार्यक्रम घेण्यास गेल्या होत्या. त्यांनीच दादींना सांगितले, ''सुभाष ज्ञान योगात चांगला आहे. सेवाही मन लावून करतो. जमुना दादी, पालू दादी आणि भूरी दादी रोज मला गळ घालतात, सुभाषला ठेवून घ्या. भोजन वाढण्यासाठी त्याची गरज आहे. भोजन वाढण्यासाठी माझ्याआधी कुणाही समर्पित भावाला ठेवले गेले नव्हते. कुणा सेवाधारींकडून ही सेवा करवून घेतली जाई.

मी अनुभव घेतला, ''बरं दादीजी'' ह्या अशा भूमिकेत राहून सेवा करण्यात खूपच शक्ती आहे. ह्याच कारणामुळे राखी पौर्णिमेचा दिवस माझ्यासाठी अति विशेष आहे.

***



# दिव्य बुद्धीधारी भ्राता जगदीशजी !

ब्र.कु. हेमंत, शांतिवन

पिताश्री ब्रह्माबाबा व त्यांच्यात प्रविष्ट शिवपित्याशी जगदीशभाईंचं प्रथम मिलन बृजकोठीत झालं. रात्री क्लास झाल्यावर बाबा म्हणाले, 'राष्ट्रपतींना हिंदी व इंग्रजीत पत्र लिहायचं आहे. शिवबाबा ब्रह्माबाबांच्या देहात अवतरित होऊन नवसृष्टी स्थापन करत आहेत, आपणही वारसा घ्या. हे कोण कोण लिहील बरं?' सभेत इतरांसोबत मंत्री, जनरल मैनेजर, प्राध्यापक व ऑफिस अधीक्षक होते. त्या चौघांसह, जगदीश भाईं व काहींनी हात उंच केला. बाबा म्हणाले, ''आज लिहून उद्या दाखवा'' तेवढ्यात वीज गेली, तर लिहिणार कसं! इतरांनी विचार केला की उद्या लिहू व बाबांनी विचारलं तर सांगू, अंधार होता. प्रातः ४ ते ४.३० योगानंतर मातेश्वरी येत. मग बाबांची मुरली असे. लिहायला रात्रच होती. भाईंना वाटलं, हा बाबांचा अर्थात सद्गुरु वा शिक्षक वा पित्याचा प्रथम आदेश आहे, मानला नाही तर अवज्ञा होईल! म्हणून ते दृढनिश्चयाने लिहू लागले व अन्य थट्टा करू लागले. विश्वरतन दादांनी टॉर्च दिला होता त्याचा उजेड मंद होता. हे पाहून परत सर्व हसू लागले. बाहेर स्ट्रीट लाईट होती. तिथे आधी हिंदीत पत्र लिहिलं, नंतर इंग्रजीत लिहिलं व पुन्हा-पुन्हा ठीक करून चांगल्या कागदावर लिहिलं. या गडबडीत ३.३० वाजले. गीत वाजत होतं, 'जाग सजनीयां जाग' भाई रुममधे गेले, ते सर्वांनी पाहिलं, रात्री खाली जातांनाही पाहिलं होतं. बाबा वृद्ध असल्याने विसरतील हे समजून त्यांनी लिहीलं नव्हतं. बाबांनी मुरलीच्या वेळी पत्राबद्दल विचारलं नाही. सर्वांना वाटलं, बरं झालं, भाईंनी ऊगीच अंधारात लिहायचे कष्ट घेतले. मुरलीनंतर बाबा म्हणाले, 'चला, डोंगरावर पिकनिक करु.' तिथे बाबांनी महावाक्य उच्चारली, मात्र पत्राविषयी बोलले नाहीत. बाकीचे लोक भाईंजींना चिडवण्यासाठी एकमेकास खुणवून हसत होते, पण भाई चुप होते. अखेर बाबा म्हणाले, 'कुणी कुणी पत्र लिहिलं?'लाजले पाहिजे होते दुसरे, मात्र लाजून मान खाली घातली भाईंनी! सर्व म्हणाले, 'जगदीश भाईंनी लिहिलं.' बाबा त्यांना म्हणाले, 'वत्स, काय लिहिलं? ते वाच!' भाईंनी वाचलं ते फारसं सुंदर नव्हे, साधारण; पण स्पष्ट होतं! बाबांविषयी असलेल्या भावना व श्रद्धेचं फूल होतं, फक्त आज्ञापालन केलं होतं भाईजींनी! भोलानाथ बाबांनी प्रसन्न होऊन वरदान दिलं, 'बाबा तुम्हाला ईश्वरीय विश्व विद्यालयाचे साहित्य लिहायचं वरदान देत आहेत. विद्यालयाचं ज्ञान कुठेही प्रस्तुत करणारे आपणच मुख्य वक्ते व लेखक बना!'

खरचं, दिव्यदृष्टीने महाभारताचे युद्ध पाहून धृतराष्ट्रांपुढे हूबेहूब वर्णन करणाऱ्या संजयाप्रमाणे, दिव्यबुद्धिधारी, ज्ञानी तू आत्मा व एक आदर्श योगी होते 'राजयोगी भ्राता जगदीश जी!' त्यांनी परमात्म ज्ञान तीक्ष्ण-तेजस्वी बुद्धिने समजून, जन सामान्याना सहज समजेल अशा सुलभ भाषेत ईश्वरीय साहित्याचं लेखन केलं. ज्ञान-सागरास बुद्धिरुपी घागरीत सामावून, 'चिडीया ने सागर को हप किया'ही उक्ती सार्थ केली. अध्यात्माच्या आकाशात मास्टर ज्ञानसूर्य बनून, अज्ञान अंधकारात भटकलेल्या असंख्य नर-नारींना जीवन पथ दर्शवला, म्हणून ब्रह्माबाबांनी नामकरण केलं 'संजय!' एक महान विद्वान, बहुभाषिक प्रकांड-पंडित, मनोविश्लेषक, तत्वचिंतक, ईश्वर-उपासक, मातृशक्ति-उद्धारक, इत्यादी वैशिष्ट्ये भ्राताजींच्या विराट व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवत. प्रत्येक क्षेत्रांतील ज्ञानावर प्रभुत्व असणारे, प्रखर प्रतिभासंपन्न जगदीश भाईजी ब्रह्माकुमारी संस्थेचे प्रमुख प्रवक्ता होते. त्यांनी म्युजियम, मेळे, सम्मेलने व प्रर्दशनी इत्यादी नूतन विधींनी देश-विदेशात ईश्वरी सेवेचा श्रीगणेश केला. विविध वर्गांच्या सेवेसाठी विंग्ज (प्रभाग) बनवल्या आणि अंतिम श्वासापर्यंत शिवपित्यास प्रत्यक्ष करण्यासाठी दधिची ऋषी समान रुद्र ज्ञान यज्ञात सर्वस्व स्वाहा केले.

भ्राता जगदीशजींचा जन्म १० सप्टेंबर१९२९ रोजी मंगळवारी मुलतान (पाकिस्तान) मधे झाला. माता 'गंगादेवी' व जमीनदार पिता 'बुद्धराम' प्रेमाने 'ऋषी' म्हणत, पण मूळ नाव होतं 'जगदीशचंद्र हसीजा.' ते खूप हसवत व म्हणत, 'माझं नाव आहेच हसीजा म्हणजे हंसत जा.' ब्रह्माबाबा 'गणेश व संजय'म्हणत, अव्यक्त बाबांनी नाव दिलं 'मनोहर फूल!' त्यांचे ईश्वरावर अनन्यसाधारण प्रेम होतं. पाच वर्षाचे असताना त्यांना ज्योतीचा साक्षात्कार झाला, त्यावेळी ते मनोमन भगवतांशी संवाद करत. प्रभु प्राप्तिसाठी बाराव्या वर्षी सुफी संतांशी ज्ञान-योग व धर्माची चर्चा करत. एकदा हैद्राबाद व कराचीला जायचा विचार आल्याने तिकडे गेले, इकडे घरचे मात्र शोधत राहिले. तिथे श्वेतवस्त्रधारी बहिंणींना पाहिलं, मात्र काहीही न समजल्याने माघारी फिरले. बालपणीच सारे धर्मग्रंथ वाचून काढले. त्यांना देशभक्तिचाही खूप शुद्ध कैफ होता. आईवर अगाध प्रेम होतं, मेहनती मातेला कणीक मळून देणं, भाजी चिरणं, दूध तापवणं इत्यादी कामात मदत करत. पित्यासोबत ते कुठे गेले तर 'माझा मुलगा' हे न सांगता, वडील म्हणत 'हा देवाचा पुत्र आहे.' सर्वात धाकटे असल्याने ते मात-पिता व भावांचे लाडके होते.भारत विभाजनानंतर ते हरियाणात आले. नंतर पूर्ण कुटुंब कुरुक्षेत्र व सोनीपतची जमीन विकून दिल्लीत गेलं. तिथे भ्राताजी, टिचर्स ट्रेनिंग कॉलेजमधे प्राचार्य बनले, काही काळ ते कॉलेजचे वार्डनही होते. वसतिगृहात मुलांना दूध-दही-तूप व पौष्टिक आहार देत. त्यांना शिकवायचा फार छंद होता, ते म्हणत,'गल्लोगल्ली जाऊन सांगावसं वाटतं, मुलं पाठवा, मी मोफत शिकवीन.' शालेय जीवनात ते मंद विद्यार्थ्यांना ज्यादा वेळ काढून शिकवत.

**सेवाव्रती :** पटण्याच्या कुंजदादी भ्राताजींची अलौकिक जन्म कथा सांगतात, 'मी दिल्लीच्या थियोसाफिकल सोसायटीत प्रवचन करायचे. एकदा वृत्तपत्रात दिलं 'ब्रह्माकुमारी प्रैक्टिकल योग शिकवतील.' व ठरवलं मी प्रवचन द्यायचे व जानकी दादी योग शिकवतील, पण त्या आल्या नाहीत. भाषण संपताच जगदीश भाई म्हणाले, 'तुम्ही फक्त प्रवचन केलत, योग नाही शिकवला.' मी म्हणाले, 'खुर्चीवर बसून, जोडे घालून योग कसा करणार?' तेव्हा १० मिनिटातच त्यांनी खाली बसायची व्यवस्था केली. तेवढ्यात जानकी दादीही आल्या, आम्ही दोघींनी योग करवून विचारलं, 'कुणाला अनुभव झाला?' जगदीशजी म्हणाले,'मी पहिल्यांदा एकाग्र झालो' व त्यांनी कोर्ससाठी फॉर्म भरला. लौकिक आई वडिलांचे नाव लिहिल्यानंतर आत्म्याच्या मात-पित्याचे नाव लिहिताना म्हणाले, 'आत्मा-परमात्मा दोन्ही अनादि-अविनाशी आहेत, मग परमात्मा पिता कसे?' मी म्हणाले, 'आत्मा पतित झाल्यावर पावन कोण बनवतो?' 'जो रिज्यूवनेट करतो अर्थात नवा जन्म देतो, तो परमात्मा पिता होय.' हे ऐकून ते संतुष्ट झाले. ते १० मिनिटे आधी येत व प्रत्येक गोष्ट सखोलपणे विचारत. ते पाचव्या दिवशी आले, मी म्हणाले, 'मिरर पत्रिकेत छापलंय, ब्रह्माकुमारी ख्रिश्चन आहेत, त्यांना लेख लिहून उत्तर द्यायचायं, आज कोर्स होणार नाही.' ते म्हणाले, 'अवश्य होईल.' आम्ही सिंधीत लेख लिहिला, त्यांनी हिंदीत लिहून 'मिरर'वाल्यांना दिला व कोर्स करता-करता सेवेत निमित्त बनले. आरंभी मी मातेश्वरींचे कौतुक करत असे, 'ज्या सरस्वतीची पूजा करतो, त्या मातेश्वरीच जगदम्बा आहेत.' जगदीश भाईंनी, 'ओ माँ,जगदम्बे..' ह्या सुंदर शब्दांत पत्रं लिहिलं, ते बाबांना फार आवडलं व त्यांनी कॉपी करून मुंबईला पाठवलं. मी ५-६ महिन्यानंतर मधुबनला जाताना ते म्हणाले, 'मी पण येतो.' दीदी मनमोहिनी म्हणाल्या, 'जन्माष्टमीला भाषण कोण करेल?' ते म्हणाले, 'भाषण शे-दोनशे ऐकतील, मी लेख लिहून देईन, ते हजारों वाचतील.' दीदींनी बाबांना विचारलं, 'जगदीशजी मधुबन येऊ इच्छितात, पण बुद्धि तीक्ष्ण आहे.' बाबा म्हणाले, 'त्यांच्याकडून १०८ वेळा निश्चयपत्र लिहून पाठवा.' भाईंनी चिकाटीने निश्चयपत्रं लिहिलं, ते पाहून दीदी म्हणाल्या, 'हे २७ वेळाच लिहिलयं.' ते म्हणाले, 'मागचं पान पहा ना!' त्यात लिहिलं होतं, 'गुणिले चार म्हणजे चारदा वाचा.' ते दीदींना म्हणाले, 'लेख लिहिला, इतकं सर्वकाही कशासाठी केलं? कसंही करून मधुबन पाठवा, नंतर १०८ वेळा नव्हे, हजार वेळा लिहीन.' ते मधुबनला गेले तेव्हा गीत वाजत होतं, 'आखिर वो दिन आया आज.' हे ऐकून प्रेमाश्रु सावरत जगदीश भाईंनी मिठी मारली. मी समजले अखेर ते बाबांवर अर्पित झाले व मी निश्चिंत झाले. खऱ्या अर्थाने ते बाबांचे सच्चे पुत्र होते. मुरलीचे तर दिवाणे होते. आदि पासून अंतापर्यंत ते बाबांचे निष्ठावान-ईमानदार-आज्ञाधारक बालक बनून राहिले.'

भ्राताजी ज्ञान श्रवणाच्या तीव्र ओढीने पहाटे चारच्या आधीच पोहचत व रात्रीही क्लास करत. वसतिगृहात जायला रात्री १२ वाजता, गेट बंद असे, ते उडी मारून जात. एके रात्री खिडकीतून उडी मारली, तिथे माठ होता, तो पडला. त्या आवाजाने जागे झालेले ओरडले, 'काय झालं? काय झालं?' उशिरा गेलेले कळू नये म्हणून सुरात सूर मिळवत ते म्हणाले, 'काय झालं? काय झालं?' मग 'चोर आला-चोर आला' म्हणत सर्व झोपले. परत प्रातः २ वाजता स्नान करून ते क्लासला गेले. एकदा वाटेत दारुड्याने पकडून मारलं, तरी जाणं सोडलं नाही. वाटेत चोर असत, चोरीच्या भीतीने घड्याळ घालत नसत, म्हणून कधी-कधी लवकर गेल्याने बहिणी दार उघडत नसत, अशावेळी ते बाहेरच वाट पाहत.

आदिदेवी सरस्वती व आदिदेव ब्रह्माबाबांच्या अमृततुल्य प्रेमाच्या परिस स्पर्शाने भाईंनी अध्यात्माचं गौरी शिखर गाठलं. बाबा भाईंना समोर बसवून स्वहस्ताने भरवत, तर कधी कुशीत निजवत. क्लास पूर्ण होताच सर्वांना बाहेर पाठवून त्यांच्यावर स्नेहामृतांची वर्षा करत. कुणी विचारलं तर बाबा म्हणत, 'शिवबाबांना खास निर्देश द्यायचा असतो म्हणून!' मम्मांच्या कुशीत तर भाईंच देहभान कापूर होई स्वर्ग सुखाचा प्रत्यय येई. एकदा लाल अक्षरात बाबांचे पत्र आले, 'वत्स, नवसृष्टी स्थापनेत वृद्ध पित्याला मदत नाही का करणार?' पत्र वाचता-वाचताच ते प्रकाशमय योगावस्थेत स्थित झाले.

**दिव्यबुद्धीधारी** : दिल्लीच्या चक्रधारी दीदी भ्राताजींची वैशिष्ट्ये सांगतात, 'भ्राताजी, बहिणींना सेवेत अग्रेसर ठेवून खूप सन्मान देत, थंडीत मध व संत्रे खाऊ घालत व प्रेमाने सेवा करत. त्यांनी गच्चीवर किचन बनवलं होतं, ते म्हणत, 'बहिणी रोज खाऊ घालतात, मी देखील कधीतरी खाऊ घालतो ना!' ते स्वतः बनवून भरवत, मुलांना बसवून प्रेमाने म्हणत, 'पोटभर खा.' भाऊ-बहिणींवर अगाध प्रेम करत. ते प्रसादास खूप महत्त्व देत. मधुबनचे ५ तोशेही श्रद्धेने १५० स्टूडंट्स मधे वाटत. रशियन भाऊ-बहिणी आल्यावर तर म्हणत, 'ह्यांना शिरा व भजी खाऊ घाला' मी म्हणे, 'हे विदेशी कसं खाणार?' ते म्हणत, 'भारतीय पदार्थ अवश्य आवडतील.' कुणी दोन मिनिटं भेटला, तरी भेटवस्तू देऊनच पाठवत. ते कधीही लौकिक जन्मदिवस साजरा करत नसत. लौकिक बंधू व पुतणे भेटायला आले, तर अलौकिकतेने भेटत व त्यांना सन्मान देत. मोठे बंधू त्यांच्या शेतीच्या हिश्श्याचे पैसे देत, ते पाकिट न उघडता माझ्या हातात तसंच्या तसं देत. आईस भेटायला जाताना ज्ञान द्यायला सोबत बहीण नेत. यज्ञाच्या आर्थिक मंदीच्या वेळी सिंध हैद्राबादहून आलेले जुने कपडे मिळत. पायजम्याच्या बाजू लहान-मोठ्या असल्या तरी ते घालून व्ही.आय.पींना भेटत व अपॉईन्टमेन्ट घेत. सेवेसाठी कार नव्हती, बस पकडायला गुल्जार दादींना बसच्या पुढे उभं करत व बहिणींना पटापट चढवून, नंतर ते चढत. फालतू खर्च न करता थोडक्यात भागवत. त्यांनी देहत्यागापूर्वी कपडे, चप्पल व इतर सर्व वस्तू क्लासमधे वाटून टाकल्या होत्या.

एकदा आंबेडकर स्टेडियम मधे प्रोग्राम होता. कुश्ती करणाऱ्या पहेलवानांनी स्टेज तोडायची धमकी दिली, भाई त्यांना म्हणाले, 'तुम्ही पहेलवान तर देवींचे भक्त आहात. ह्या भगिनी साक्षात देवी आहेत. त्यांचं कार्य बाधित केल्याने तुम्हाला पुढे विघ्न येतील,' त्यांना शांत करुन कार्यक्रम निर्विघ्न पार पाडला. असच एकदा रशियन ग्रुप रेल्वेने आबूला जाणार होता. तेवढ्यात संप होणार हे कळलं. भाईजी म्हणाले, 'पोलिसांना अर्ज देऊन परवानगी घ्या.' पोलीस म्हणाले, 'बोट क्लब मधे संप होईल, सामान्य भागात नव्हे, परवानगीची गरज नाही.' हे मी भाईंशी बोलले, स्वतः एकाला फोनवर म्हणाले, 'छोटे साहेब परवानगी देत नसतील, तर मोठ्यांकडून घ्या' मोठे साहेब म्हणाले, 'संप दुसऱ्या भागात होईल.' भाई म्हणाले, 'तरीही लिहून घ्या,' खूप प्रयत्नानंतर त्यांनी स्टॅम्प मारून लिहून दिलं. दुसऱ्या दिवसी संपामुळे ट्रैफिक बंद होतं. मात्र आमची बस न अडवता फिरत होती, त्यामुळे विदेशी वेळेत स्टेशनवर पोहोचले. भाईजींना तेजस्वी बुध्दिद्वारे चाहूल लागताच, विघ्नांचा विनाश करत म्हणून ब्रह्माबाबा त्यांना गणेश म्हणत. एकदा बनारसहून कॉन्फरन्सचं निमंत्रण आलं. भाईजी ट्रेनने थर्ड क्लासमधे गेले व वरच्या बर्थवर रजई घेऊन झोपले. दिवसा कामामुळे थकल्याने गाढ झोपेत कूस बदलली व खाली पडले. खाली चहा पिणाऱ्याच्या कपबशा फुटल्या, ते ओरडू लागले, 'कपबशीचे पैसे द्या.' पण पैसे कुठून देणार? बहिणींनी तिकीट काढून रिक्षेसाठी एक रुपया दिला होता, भाईंनीं अभिनय केला की खूप मार लागलाय. ते पाहून लोकांना दया आली व त्यांनी सोडलं. रिक्षेचं भाडं वाचावं म्हणून पायीच निघाले व थोडं पुढे रिक्षात बसले व

पायजमा फाटला, तो तिथेच शिवला. ते प्रवासात सुई-दोरा सोबत नेत व कपडे फाटले, तर लगेच शिवत. बहिणी दोन आणे देऊन छपाई व खरेदीसाठी पाठवत, भाई पायीच जात व प्रेमाने पटवून ते दोन आणेही वाचवत.

**वक्तशीर** : आत्मप्रकाश भाई (ज्ञानामृत संपादक) भाईजींबद्दलच्या आठवणी सांगतात, 'भ्राताजी एक महान ज्ञानी-योगी-त्यागी-तपस्वी व सेवक होते. ते म्हणत, 'प्रत्येक गोष्ट-काम बेस्ट, चीपेस्ट (स्वस्त) व अर्लिएस्ट (त्वरित) हवं, पण स्वस्त व त्वरीतचा अर्थ दर्जाहीन नव्हे. भाईजी ज्ञानदान करण्यात पटाईत होते. एकदा उर्दुत 'सच्ची गीता' लिहायला मुस्लिम बंधूपाशी गेलो, तेव्हा उर्दु टाइपिंग नसल्याने उर्दु हाताने लिहीत. भाईजींनी त्यास समजवलं की ही कुणाची महावाक्ये आहेत, लिहिणारा कसा असावा? त्याने काय करू नये? ऐकता-ऐकताच तो देहभान विसरला व म्हणाला, 'मी खुदाला नंतर भेटीन, पण आज तुमच्यातच खुदा पाहतोय.' त्यांच्या वाणीत देहातीत करायची किमया होती. भाईंची स्मरणशक्ति ही अजब होती. एकदा वैज्ञानिक एल.एस.माथुर यांनी इंग्रजीत भाषण केलं व ते हिंदीत करायला सांगितलं, भाईंनी हूबेहूब हिंदीत भाषण केलं, माथुरजींनी खूप कौतुक केलं. चारशे पानांचं 'कार्टून व कहावते (म्हणी) पुस्तक छापलं जात होतं, आजारी असूनही ते ग्लोबल हॉस्पिटल मधून डायरेक्शन देत म्हणाले, 'कागद एक सारखा हवां.' व विचारलं, 'पुस्तक कधी तयार होईल? मी म्हणालो, '४-५ दिवस लागतील' ते म्हणाले, 'फार उशीर होईल' त्यांना अंताची चाहूल लागली होती. 'कार्टून व कहावते' हे पुस्तक व ज्ञानामृत, वर्ल्ड रिन्युअल इत्यादी मासिकं दाखवली, ते म्हणाले, 'स्टैण्डर्ड छान जपलयं' मी म्हणालो, 'तुम्ही राम व मी छोटा भाऊ भरत तुमचंच कार्य सांभाळतोय.' ते म्हणाले, 'नाही-नाही, तुम्हीही अनुभवी बनलात, सर्वांना सोबत घेऊन चांगली सेवा करताय. मी संतुष्ट आहे.' ह्या प्रेमळ शब्दांनी मन भरून आलं.ते पुस्तकं-लेख व अनुभवांच्या रुपात ज्ञानाचा अथाह खजिना देऊन गेले. त्यांचे ईश्वरी नियम व धारणांयुक्त अचल-अडोल जीवन सदैव प्रेरित करत राहील.


जगदीशभाईंच्या सेवेचं सौभाग्य प्राप्त झालेले योगेश भाई अनुभव सांगतात, 'भाईजी, सेवा कमी घेत, बहिणींची व सेंटरची सेवाच जास्त करवत. एकदा ते जसलोक हॉस्पिटल मधे २२व्या मजल्यावर दाखल झाले होते. एके दिवशी नाष्टा नेऊन द्यायला थोडा उशीर झाला. २२व्या मजल्यावर जायचं होतं, लिफ्ट वर गेली होती. जिना चढून ७व्या मजल्यावर पोहचलो अन् थकलो व भीत-भीतच लिफ्ट ने गेलो, तोपर्यंत ते ट्रिटमेंटसाठी निघून गेले. ते फार वक्तशीर होते, वेळेची खूप कदर करत. सर्वांशी समान व्यवहार करून आपलं बनवत. प्रत्येकाची वैशिष्ट्ये पारखून सेवा देत. मी लहान असूनही मित्रासारखं वागत. त्यांचं राहणीमान साधं होतं. रुम एकीकडे, तर बाथरुम दुसरीकडे होतं, ते पाहून कुणीही दंग होईल! त्यांना देश-विदेशातून फोन येत. विदेशींची झोपायची वेळ व त्यांची जागायची वेळ एकच असे. त्यामुळे भाईंनी बाथरुम मधेच फोन लावला होता, ते तेथूनच तास-तास बोलत व डायरेक्शन देत. त्यांना सत्य अतिप्रिय होतं, खोटं लगेच पकडत. ते प्रेमही खूप करत व सेवाही खूप प्रेरित करत. दुपारी ११ ते १२.३० पर्यंत विश्राम करत. मी एक वाजता विश्रांतीस जाई, ते लगेच उठवायला येत व म्हणत, 'अरे तू तर शिवाजी महाराजांच्या गावाचा आहेस, त्यांनी देशासाठी किती मेहनत केली, तू तर ईश्वराच्या सेवेत आहेस.' मी ही त्वरीत हसत उठत असे. त्यांची मधुबनमधे देहत्यागाची तीव्र इच्छा होती. एके रात्री १२.३० वाजता ग्लोबल हॉस्पिटल मधे म्हणाले, 'मला बेडसहित मधुबनला घेऊन चल,' मी म्हणालो, 'सर्व डिस्टर्ब होतील' ते म्हणाले, 'मी तुझी सेवा सोडवीन' तेव्हा गेटपर्यंत बेड नेऊन म्हणालो, 'इथूनच पांडव भवन पहा' व समजूत घालून झोपवलं. अंतिम इच्छेनुसार जगदीश भाईंनी १२ मे २००१ रोजी सुखधाम मधे देहत्याग करून संपूर्ण स्थिती प्राप्त केली.

ज्यांच्या संपर्कात भ्राता जगदीशजी आले त्या सर्वांचे जीवन उजळून गेले.

'महाजनस्थ संसर्ग: कस्य नोन्नतिकारक: ।
पद्मपत्रस्थितं वारि धत्ते मुक्ताफलश्रियम् ।।'

महान व्यक्तींच्या संपर्कात आल्यावर कुणाचीही उन्नती झाल्यावाचून राहत नाही. आता हेच पहा ना, पाण्याचा थेंबही कमलपत्रावर पडला तरी मोत्याप्रमाणे चमकू लागतो. भ्राताजींच्या जीवनास याच ओळी समर्पक वाटतात.

***



# पसायदान

(भाग – १)

**संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यनिर्मितीपैकी पसायदानातील विशाल दृष्टीकोनाने असंख्य साधकांना आणि साहित्यिकांना मोहित केले आहे. ब्र.कु. संस्थेतील एक भ्राता ज्ञानेश्वर, पुणे यांनाही या विषयाची मोहिनी पडली आणि त्यांनी आपल्या पद्धतीने या विषयाची उकल केली आहे, ती इथून पुढील अंकात टप्प्याटप्प्याने प्रकाशित करत आहोत. ब्र.कु. ज्ञानेश्वर यांनी केलेली छोटी छोटी भाषणे/ निवेदने ब्र.कु. सुजाता यांनी लिपिबद्ध केली आहेत. आशा आहे तुम्हाला हे लेखन आवडेल.**

नमस्कार ओम शांती तुम्हा सर्वांना संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, महाराष्ट्राचे संत माहीत आहेतच. ते फक्त महाराष्ट्राचेच संत नाहीत, तर संपूर्ण भारतात त्यांना ओळखले जाते. इतक्या लहान वयात इतका विद्वत्तापूर्ण ग्रंथ त्यांनी रचला. ज्ञानेश्वर महाराजांची ओळख विशेष करून त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या निमित्ताने लक्षात आहे आणि त्यांनी ज्या भागवत धर्माची स्थापना केली त्यासाठी सुद्धा आहे. पंढरपूरला दरवर्षी चालत वारकरी लोक जातात. आपण ऐकले असेल ज्ञानेश्वर महाराज, यांना प्रेमाने माऊली म्हणतात. आणि मी सुद्धा त्यांना माऊलीच म्हणेन. तर या माऊलीने ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला. भगवद्गीता हा ग्रंथ संस्कृत मध्ये आहे. आणि त्याकाळी मराठी भाषकांच्या करिता त्यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ प्राकृतामध्ये लिहिला. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ गीतेवरचे निरूपण आहे. भगवद्गीता ही १८ अध्यायांची आहे, त्यात सातशे श्लोक आहेत आणि ह्या सातशे श्लोकांचे निरूपण माऊलींनी केले आहे ९००० ओव्यांमध्ये. इतक्या विपुल साहित्यातल्या एका भागावर काही चिंतन, विचार चर्चा करणे हा एक उद्देश आहे. कारण हे पसायदान नऊ ओव्यांचे आहे. जर त्याचे सार पाहिले तर ते खूप संक्षिप्त मध्ये सुद्धा होऊ शकते. परंतु कधीकधी आपण म्हणतो दोन ओळींमध्ये (बिटवीन द लाईन) जो गर्भितार्थ असतो त्यानुसार जर आपण चिंतन केले तर त्याचा खूप विस्तार सुद्धा होऊ शकतो. माझ्या मते ९००० ओव्याचे सार पसायदानात आहे. भगवद्गीतेमध्ये जे ज्ञान दिले आहे त्याचे सार सुद्धा या पसायदानामध्ये आहे असे मला वाटते. पसायदान याआधी मी वाचले होते आणि अभ्यास केला होता, परंतु त्यामागे इतका भावार्थ असेल, गहन अर्थ असेल याची मला कल्पना नव्हती. परंतु जसे मी ब्रह्माकुमारीच्या संपर्कात आलो, तेथील ज्ञान ऐकले, आणि पुन्हा जेव्हा पसायदानाचे वाचन केले तेव्हा मला आश्चर्य वाटले की माऊलींनी इतक्या विस्ताराने, इतक्या सखोलात जाऊन आणि गहनतापूर्वक पसायदान लिहिले आहे त्याचा उद्देश काय असेल. एखाद्या कंपनीचा डायरेक्टर किंवा मॅनेजर आपल्या कंपनीचे एक उत्तुंग आगामी चित्र रेखाटतो. जितके ते चित्र सुस्पष्ट तितका त्याला द्रष्टा म्हणतात. माऊली तर विश्वाचे चिंतन करीत आहेत. विश्वाचे चित्र आपल्यासमोर मांडत आहेत.आगामी विश्वाचे किंवा विश्व परिवर्तनाचे चित्र या पसायदानामध्ये आहे असे मला वाटते. एक एक वाक्य आपण जर पाहिले, विवेचन केले, तर ते एवढे अर्थपूर्ण आहे की दोन ओळींमधील गर्भित अर्थ वाचणे म्हणजे काय ते समजते. फक्त दोन ओळींमधील नाही, तर त्या वाक्याच्या पलीकडे जाऊन काय अर्थ असू शकतो हे समजते.

पसायदानाची सुरुवात या ओळीने आहे.

आता विश्वात्मके देवे। येणे वाग् यज्ञे तोषावे।<br>
तोषोनी मज द्यावे। पसायदान हे ।।१।।

हे जे पसायदान माऊलींनी मागितले आहे त्या विश्वात्मक देव / भगवंत ज्याला आपण सर्व अल्ला, गॉड सुद्धा म्हणतो किंवा दुसऱ्या कुठल्याही शब्दांचा प्रयोग केला तरी शेवटी आहेत ते एकच भगवंत. सबका मालिक, साऱ्या विश्वाचा ईश्वर. माऊलींनी हे पसायदान फक्त मराठीसाठी किंवा फक्त भारतासाठी नाही मागितले आहे तर साऱ्या विश्वासाठी मागितले आहे. साऱ्या विश्वाचे कल्याण होवो अशी प्रार्थना करतात. सर्वे भवन्तु सुखिनः। सर्वे संतु निरामयाः । सर्वे भद्राणी पश्यन्तु । या कश्चित दुःख भाग्भवेत।

माऊलींनी हे पसायदान मागितले आहे विश्वात्मक देवाकडे, भगवंताकडे. आणि ह्या विश्वात्मक देवाला त्यांनी संतुष्ट केले आहे आपल्या वाग् यज्ञाने. वाग् यज्ञ म्हणजे वाणीचा यज्ञ. त्यांनी जी वाणी चालवली आहे, त्याद्वारे विश्वात्मक देवाला संतुष्ट केले. त्यांचा विश्वास होता की ह्या मागणीने तो विश्वात्मक देव संतुष्ट होईल. आणि जेव्हा कोणी संतुष्ट होते तेव्हा त्याच्या मुखातून आशीर्वाद निघतात आणि तेच औषधाचे काम करतात.

यज्ञ अनेक प्रकारचे असतातजसे अश्वमेध यज्ञ, पुत्र कामेष्टीयज्ञ आणि हा वाणीचा यज्ञ. रामायणाशी निगडित कथांतून आपण ऐकतो वाचतो यज्ञात विघ्ने आणणाऱ्या असुरांचा नाश श्रीरामाने केला. रोज आपण जेव्हा खाणे खातो तो पण यज्ञच आहे. म्हणून म्हणतात –

वदनी कवळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे
सहज हवन होते, नाम घेता फुकाचे
जीवन करी जीवित्व, अन्न हे पूर्णब्रह्म
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म।

हे फक्त पोट भरण्यासाठी आपण जेवण करत नाही. परंतु हा देखील एक यज्ञ आहे. अग्नी हा जठराग्नी आहे आणि त्याला शांत करण्यासाठी आपण त्यात आहुती टाकतो अशा विचारांनी भोजन केले तर खाणाऱ्याचे कल्याण होईल. आणि हा तर वाग् यज्ञ आहे आणि ह्या वाग् यज्ञानी माऊली विश्वात्मक देवाला संतुष्ट करीत आहेत.

हे आपण पाहिले पहिल्या ओवीचे विश्लेषण. पुढील ओवी पुढील भागात तोपर्यंत नमस्कार.

***

---

(पृष्ठ क्र.३ वरुन)

बनण्यासाठी नक्की काय करायचे? खालील अभ्यासांपैकी काही करून पहा काय अनुभव येतो ते.

१) स्वतःला पुरुषोत्तम संगमयुगी ब्राह्मण समजून दैनंदिन कार्य पार पाडणे. जेव्हा आपण स्वतःला संगमयुगी समजू लागतो तेव्हा विकाराधीन पूर्व संस्कारांचे प्रभाव हळूहळू ढीले पडू लागतात. जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा एक क्षणभर का होईना या भानात टिकण्याचा प्रयत्न करावा. हळूहळू अभ्यास वाढवत नेता येईल असे करावे.

२) या सृष्टीचक्रातील परिवर्तनाची घटिका जवळ येत चालली आहे. सर्व मनुष्यात्म्यांना आपल्या निजधामास परत जायचे आहे. त्या निजधामाची आणि तिथे असणाऱ्या शिवपित्याची निराकार ज्योतीबिंदू स्वरूपात आठवण करायचा अभ्यास अति आवश्यक आहे.

३) जसे अर्जुनास सांगितले – हे सर्व आधीच मृत झालेले आहेत आणि तुला केवळ निमित्तमात्र बाण मारायचे आहेत तद्वत आपल्या अवतीभवती असणाऱ्या प्रत्येकाकडे पाहताना आत्मिक दृष्टीने पाहणे. हीच खरी तपस्या आहे.

अशा प्रकारे निर्मल वैराग्य देणाऱ्या ज्ञानबिंदूंवर अभ्यास करणे म्हणजेच मरजीवा बनण्याकडे वाटचाल करणे होय. यासाठी आपले विहित कर्म त्यागण्याची आवश्यकता नाही. दैनंदिन व्यवहार चालू ठेवून हा अभ्यास करता येतो. अशा अलौकिक वाटचालीकरिता सर्वांना मराठी नववर्षाच्या निमित्ताने अनेकानेक शुभेच्छा !

***

## सुविचार

वेळेवर कामास येते तीच खरी कुशाग्र बद्धिमत्ता – यजुर्वेद



# महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकांची मानसिकता बदलावी लागेल

ब्र.कु. प्रफुल्लचंद्र, सॅन दिएगो, अमेरिका

आज महिलांच्या उत्कर्षाविषयी, स्त्रियांची सुरक्षा, अत्याचार, शोषण इत्यादी अनेक समस्यांवर चर्चा, प्रवचन करणे ही एक फॅशन झाली आहे. महिलांच्या समस्या सोडवण्याबाबत अनेक स्त्री-पुरुष, नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून अनेक मोठे दावेही केले जातात. राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडूनही, कायद्याने सर्व प्रयत्न केले जात आहेत. पण सरकारचे प्रयत्नही तोकडे पडतात असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही.

महिलांच्या समस्या कमी होण्याऐवजी त्या सातत्याने वाढत असल्याचे आपण पाहत आहोत. महिलांची छेडछाड, त्यांच्यावर होणारे अत्याचार, बलात्कार, त्यांचे शोषण, घरगुती हिंसाचार, मुलींना जन्मताच दुधात बुडवून त्यांची हत्या, स्त्री भ्रूणहत्या आदी प्रकार अधिक तीव्र होत आहेत. वरील समस्या सोडवण्यासाठी काही स्वयंसेवी संस्था चांगले काम करत आहेत. पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठीही प्रयत्न सुरू आहेत. आपल्या देशाच्या न्यायव्यवस्थेने या संदर्भात अनेक कायदेशीर तरतुदीही केल्या आहेत. गुन्हेगाराला मरेपर्यंत शिक्षा दिली जाते, पण एवढे प्रयत्न करूनही परिस्थिती उत्तरोत्तर बिकट होत चालली आहे. हे वास्तव स्वीकारावे लागेल.

अनेक ठिकाणी घरगुती हिंसाचाराच्या बहुतांश कथा ही आणखी एक लक्ष वेधून घेणारी गोष्ट समोर आली आहे. विशेषतः काही काळापूर्वी होऊन गेलेल्या ताळेबंदीच्या काळातील वृत्तपत्रातील नोंदी तसे दर्शवितात. त्यातील ८०% पेक्षा जास्त कथांमध्ये कुटुंबातील सदस्य, नातेवाईक किंवा शेजारी गुंतलेले असतात. असे परिचयातलेच महिलांवर अत्याचार करतात. कुटुंबातील महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी ज्या कुटुंबीय किंवा नातेवाईकांवर आहे, तेच जर शोषण करू लागले, रक्षणकर्ता स्वतःच भक्षक झाले तर या महिलांनी जावे कुठे? प्रत्येक घरात पोलिस ठेवणे तर सरकारला शक्य नाहीये.

अशी ही जटिल समस्या सोडवण्यासाठी, लोकांची मानसिकता, त्यांचा दृष्टिकोन बदलायला हवा. वृत्तीचे दमन करण्याच्या मार्गाने किंवा कायदेशीर मार्गाने परिस्थितीत विशेष सुधारणा होऊ शकत नाही. ही गोष्ट जितक्या लवकर समजेल तितके चांगले. यासाठी आत्मभान आवश्यक आहे. वासनेने ग्रासलेल्या माणसाचे मन मग ती स्त्री असो वा पुरुष, सदैव बाहेरच्या जगात भटकत असते. त्याची नजर नेहमी विलासी दृश्यांच्या शोधात असते.

अशा विलासी प्रवृत्तींना समजून न घेता दडपण्याचा प्रयत्न केला तर त्यात विशेष यश मिळत नाही. मग संधी किंवा एकांत साधून विकारी प्रवृत्ती पुन्हा जागृत होते.

या समस्या सोडवण्याचा काही योग्य आणि सोपा मार्ग असेल तर तो म्हणजे अध्यात्मशास्त्राच्या मार्गाने. खऱ्या अर्थाने आत्म-जागरण करणे. अध्यात्मशास्त्राच्या शाश्वत तत्त्वांची योग्य माहिती मिळाल्यावर जेव्हा व्यक्ती आंतरिक दर्शन करते तेव्हा त्याच्या दृष्टी, वृत्ती आणि कार्यामध्ये नैसर्गिक बदल होऊ शकतो आणि विषय-वासना हळूहळू शमत जातात. आत्म-ज्ञानाच्या आधारे, जेव्हा एखादी व्यक्ती आत्मचिंतन आणि आत्मदर्शन करते, तेव्हा त्याला स्वतःतील कमतरता आणि दुबळेपणा जाणवतो. त्यानंतर तो देहभानापासून मुक्त होऊन आत्म्याच्या स्मृतीत स्थित होऊ लागतो. प्रत्येक व्यक्ती, स्त्री असो वा पुरुष, तो आध्यात्मिक दृष्टीने एक जीवात्मा आहे हे पाहणारा बनतो. अशा प्रकारे जर आपण आपल्या मूल्यांमध्ये सकारात्मक बदल केला, आपले जीवन मौल्यवान आणि चारित्र्यसंपन्न केले तर आपण एक चांगला समाज स्थापन करू शकतो, जिथे आपल्या माता, बहिणी, मुली सुरक्षित राहतील आणि निर्भयतेचा अनुभव घेतील.

आध्यात्मिक संबंध किंवा नाते कायम करणे हे खरे अध्यात्माचे उद्दिष्ट आहे. यात स्वतःला शुद्ध प्रकाशबिंदू आत्मा मानणारी व्यक्ती इतरांना त्याच रूपात पाहते.

आत्मवत् यःपश्यति.. या उक्तीनुसार स्वतःला आत्मा समजणे ही पहिली पायरी आहे.म्हणजे मी देह नाही याचाच अर्थ स्त्री-पुरुष या भानापासून दूर जाणे. ब्रह्माकुमारीज संस्थेत शिकविल्या जाणाऱ्या राजयोग अभ्यासाची ही पहिली पायरी आहे.

या स्थितीत भौतिक आणि शारीरिक आसक्तीला वाव नसतो. माणसाचे जीवन सद्गुण, सामर्थ्यवान आणि मौल्यवान बनते. जीवन हे प्रेम, दया, सहानुभूती, सहिष्णुता या सकारात्मक भावनांनी भरलेले असते. सर्वांसाठी समानता आणि आदराची भावना निर्माण होते. विकृत मानसिकतेसाठी कुठेही जागा उरत नाही. आध्यात्मिक ज्ञानाची ओळख देऊन, विशेषत: योग शास्त्राचे प्रशिक्षण देऊन, अशा प्रकारे जनमानसातील सुप्तावस्थेतील मूल्ये जागृत करण्याचे काम कदाचित मोजक्याच संस्था करत असतील.

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय ही महिलांसाठी अलौकिक पद्धतीने काम करणाऱ्या अशा संस्थांपैकी एक लक्षवेधक जागतिक स्तरावरची संस्था आहे. १९३७ साली दादा लेखराज या एका प्रसिद्ध हिरे-जवाहिऱ्याच्या व्यापाऱ्याने उत्कट वैराग्य भावनेतून एक क्रांतिकारक पाऊल उचललं. माता-भगिनींचे विश्वस्त मंडळ नेमून त्याच्या हवाली आपली करोडो रूपयांची मालमत्ता / संपत्ती सुपूर्त केली. इतिहासातील काही तुरळक उदाहरणे वगळता बहुतेकांनी स्त्रियांचा अध्यात्मातील सहभाग मर्यादितच ठेवला होता. 'दादा लेखराज' यांचे कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवले गेले. ब्रह्माबाबांच्या द्वारे साक्षात शिवपित्याने दिव्य ज्ञान प्रकट केले आणि स्त्रियांद्वारे या अलौकिक चळवळीची सुरुवात झाली. आज हे विश्व विद्यालय एकशे चाळीस देशात आध्यात्मिक जागृतीसाठी कार्यरत आहे. आठ हजाराहून अधिक शाखा असणाऱ्या या संस्थेचा संपूर्ण कार्यभार माता-भगिनी सांभाळत आहेत. महिला सबलीकरण आणि नारीशक्तीचा गौरव याहून वेगळा काय असावा !

या संस्थेशी निगडित, तिचा महिला विभाग, महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि जागतिक स्तरावर महिलांचा सन्मान करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहे आणि त्याचे उत्कृष्ट परिणामही मिळत आहेत. संस्थेचे लक्ष वेधून घेणारे वैशिष्ट्य म्हणजे महिलांच्या सन्मानासाठी व अभिमानासाठी या संस्थेचे संपूर्ण कामकाज आणि नेतृत्व महिलाच करत असून, पुरुषही नि:स्वार्थपणे सहकार्य करतात.

अशा बहुमोल कार्याबद्दल संस्थेला अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत आणि संस्थेत दिल्या जाणाऱ्या आध्यात्मिक शिक्षण व प्रशिक्षणाची जबाबदारीही भगिनींवर देण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी आध्यात्मिक प्रबोधनाच्या या प्रयत्नात आपण सर्वजण भागीदार होऊ या. आणि परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करू या. संस्थेची एक लक्षवेधी घोषणा लक्षात ठेवण्यासारखी आहे. 'जगातील बदलाचा आधार व्यक्तिगत बदल आहे.'

**(भावानुवाद: ब्र.कु.शीतल, टोरांटो, कॅनडा)**

***

**यक्षप्रश्न**

या जगात वायुपेक्षा अधिक वेगवान काय आहे ?

- या जगात वायुपेक्षा वेगवान मन आहे. एका क्षणात मन भारतातून अमेरिका-इंग्लंडसारख्या दूर असलेल्या स्थानास पोहोचू शकते.



# जपान डायरी

## (भाग-३)

## अविरत सेवाभाव

ब्र.कु. रेश्मिता, टोकियो

स्व-सेवा आणि जनसेवा यातील संतुलन हे आध्यात्मिक उन्नतीमधील एक महत्त्वाचे अंग आहे. स्वार्थ (स्वअर्थ-स्वतःसाठी) आणि परमार्थ (परम म्हणजे श्रेष्ठ किंवा उदात्त कारणासाठी) म्हणजेच स्वतःसोबत इतरांसाठीही ह्याचे संतुलन उत्तम प्रकारे साधता आले तरच स्व-परिवर्तन होणे शक्य होते. आध्यात्मिक मार्गावर चालण्याचा निर्णय जेव्हा करतो तेव्हा स्व-सेवा तर होतेच; पण लोकसेवा करण्याचीही गोडी लागते.

स्व-सेवा करताना परमेश्वर चिंतनातून जी शांती, सुख, समाधान मिळते ती काही पैशाने खरेदी करता येण्या सारखी गोष्ट नक्कीच नाही. परंतु जे मला मिळाले आहे ते दुसऱ्यांनाही मिळावं म्हणून जी तळमळ अथवा धडपड सुरू होते त्यालाच परमार्थ किंवा लोकसेवा म्हणता येईल. जेव्हा ही जागृती स्वतः मध्ये होते तेव्हा खूप सकारात्मक ऊर्जा प्राप्ती होते. पण ह्याच्या विपरीत जेव्हा आपण अध्यात्म मार्गावर चालताना स्वतःला होणाऱ्या सूक्ष्म प्राप्तीची जाणीव कमी होते तेव्हा मात्र मनांत अनेक प्रश्न निर्माण होतात, उदाहरणार्थ, इतरांची सेवा का करायची? त्याने काय होणार? मीच का सेवा करू? इतर लोकं करतील की?

अध्यात्ममार्गावर प्रवास सुरू केला की अनेक गोष्टी उलगडायला सुरुवात होते कारण आपण ईश्वरी महावाक्य नित्यानेमाने ऐकतो, चिंतन करतो, राजयोगाद्वारे स्वतः मध्ये बदल घडवून आणू लागतो. मग अशी काही धारणा व्हायला लागते की स्व-सेवे बरोबरच ईशसेवा म्हणजेच जनसेवाही तितकीच महत्त्वाची आहे. कारण ह्या सेवेमुळे ईश्वराची आणि लोकांची सकारात्मक ऊर्जा ही आशीर्वादाच्या रूपात प्राप्त होते, आणि हेच आशीर्वाद जीवनाचा मार्ग सुकर बनवतात. ह्या श्रेष्ठ मार्गावर मग निःस्वार्थ सेवा ही भावना आपोआपच निर्माण होत जाते.

वरील प्रस्तावनेचे कारण म्हणजे माझ्या अध्यात्म मार्गामधील स्वसेवा आणि लोकसेवा याचा अनुभव तुमच्या समोर मांडणार आहे. माझ्या ह्या अध्यात्म मार्गावरचा प्रवास हा गेली ३० वर्ष अव्याहतपणे चालू आहे. मी आणि माझा संपूर्ण परिवार नियमितपणे ब्रह्माकुमारी संस्थेशी जोडलेले आहोत. संस्थेमध्ये स्व-सेवा, लोकसेवा एकत्रितपणे साधता येतात. परंतु म्हणतात ना सगळे दिवस सारखे नसतात. जीवनात चढ-उतार होत असतातच. कधी कधी खूप उत्साह असतो तर कधी कधी निरुत्साह वाटू लागतो, अडथळे जाणवू लागतात. सेवाभाव हेच माझे जीवन आहे याची खात्री ईश्वरी ज्ञानाद्वारे झाली आहे. नैसर्गिक स्वरूपात हा सेवाभाव असावा. कधीतरी एका क्षणी असेही वाटते की सगळं थांबलं आहे. काय होतंय हे? मी सेवा करत आहे पण ज्या प्रकारची प्राप्ती मला अपेक्षित आहे ती का होत नाहीये? अशा प्रश्नांची मालिका सुरू होते. पण अशा वेळी खरच थांबावं का? तर माझा अनुभव हेच सांगतो की थांबावे! स्वतःला विचारावे की काय होतंय? काय कारण आहे? आता ही स्व सेवा अशा वेळी कामाला येते. मग हळू हळू त्याचा उलगडा होत जातो.

असे म्हणतात ना रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल – काहीतरी नक्कीच मोठी सेवा माझ्या कडून होणार आहे, त्या मोठ्या सेवेपूर्वीची ही शांतता, स्तब्धता आहे. तरी पण मन थोडं खट्टू झालेलं असतं, अधीर झालेलं असतं त्यामुळे अनेक प्रश्नांच्या गोतावळ्यात मग विचारचक्रही वेग धरतं. अशा वेळी ईश्वरी महावाक्य आठवल्याने, मन शांत झाल्याने कळतं "धीरापोटी फळे रसाळ गोमटी" किंवा "धीरज धर मनुवा" ही महावाक्ये अशा गोंधळलेल्या मनःस्थिती मध्ये नुसती आठवून नाही चालत तर ती प्रत्यक्षात आणायची असतात. जेव्हा मन शांत असते

तेव्हाच हे जमते. मनाच्या अधीर अवस्थेमध्ये ती संधी आपल्याला दिसत नाही. म्हणूनच ईश्वरी महावाक्य आहे – स्थिर आणि शांत मन असेल तर प्रत्येक घटनेमागचं उद्देश लक्षात येईल. त्यातून एक निश्चितता येते. अशा वेळी गीतेमधील महावाक्यांचा अर्थ कळतो की, ''जे होते ते माझ्या भल्यासाठीच.. जे घडून गेले ते उत्तम, जे होत आहे ते पण उत्तम आणि जे होणार आहे ते तर अति उत्तम''.

मनाच्या अशा अधीर अवस्थेमध्ये मीही गोंधळून गेले होते, काय करावे काहीही सुचत नव्हते. त्याच वेळी अचानक मधूबनहून (ब्रह्माकुमारी मुख्यालय, आबू पर्वत, परमात्म अवतरणभूमी) माझ्यासाठी सेवेच्या संधीचा एक संदेश आला आणि एकदम जाणवला तो क्षण, फळे रसाळ गोमटी, धीरज धर मनुवा या उक्तीचा अनुभव घेण्याचा. सेवा मोठ्या प्रमाणावर होणार हे पक्के होतेच कारण सेवेचे निमंत्रण हे थेट मधूबन, आबू अब्बा का वतन मधून संदेश येणे हा ईश्वरी संकेत होता. मनाला खूपच उभारी आली. एक मात्र चांगलं कळले की सेवा थांबलेली नसते तर दृश्य स्वरूपातील सेवा घडत नसली तरी हा मधला काळ म्हणजे संयमाची शिकवण देणारा असतो.

मधूबनहून संदेश येताच काही तासांनंतर रजनीदीदींचा जपान मधील कोबे ह्या शहरातून संदेश आला. रजनीदीदी कोबे शहरात वास्तव्याला असून त्या जपान आणि फिलिपीन्स या दोन देशांतील ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रांचे संचालन करतात. टोकियोमध्ये फक्त काही मोठ्या कार्यक्रमांसाठीच त्या येतात, उदा. राखी पौर्णिमा, दिवाळी इत्यादी. तसा दीदींचा मला दर आठवड्याला कोबेहून फोन असतोच, त्या मला जपान टोकियो शहरामधील सेवेसाठी मार्गदर्शन आणि सेवा करण्याची संधी देतात. दीदी मला वैयक्तिकरित्या ओळखतात कारण गेली अनेक वर्ष मधूबन ग्लोबल ऑफिस मध्ये केलेली सेवा, दादी, दीदीचा सहवास ह्या सगळ्यांचे संचित. तर ह्या अचानक आलेल्या सेवेसाठी कोबेहून येणे त्यांना अशक्य होते म्हणून माझ्याशी चर्चा करून, माझेही मत विचारात घेऊन दीदीनी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेखा आखून दिली. माझ्यावर विश्वास दाखवून सांगितले की सर्वांना सोबत घेऊन सेवा कर आणि बाबा कर्ता-करविता आहे तो सहजरित्या कार्य सफल करून घेईल ही आठवण ही करून दिली.

तीन प्रकारच्या सेवा – मनसा, वाचा, कर्मणा वाचा आणि कर्मणा ह्या दृश्य स्वरूपातील सेवा होत. परमेश्वराकडून उच्च कोटीच्या ऊर्जा जसे पवित्रता, सुख, शांती, आनंद, प्रेम, ज्ञान आणि शक्तीचा संचय करणे म्हणजे ध्यान धारणा करणे. अदृश्य स्वरूपातील सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह स्वतः मध्ये साठवून जनमानसात प्रसारीत करण्याची कला म्हणजे मनसा सेवा. ही सेवा महणजे स्व उन्नती. ह्या लहरी पसरवणे म्हणजेच आपल्या सभोवतीचे वातावरण शुद्ध आणि पवित्र करणे. रोजच्या सरावाने काही दिवसात आपण स्व उन्नती अनुभव करू शकतो.

माझी आकांक्षा होती की काही तरी मोठी सेवा घडावी. ते कोणते वेगळेपण असणार हे त्या मधूबनहून आलेल्या फोनने आणि रजनीदीदींच्या निरोपाने कळले. एक ब्रह्माकुमार भाई ऑफिसच्या कामानिमित्त जपान मध्ये टोकियो शहरात आले आहेत आणि सेवाकेंद्राला भेट देऊ इच्छितात. २०११ पासून हे दिल्ली निवासी भाऊ ईश्वरी ज्ञान आत्मसात करत आहेत आणि त्यांचे नाव सतीश भाई घोरमडे, मूळ नाशिकचे, मला त्यांचे नाव कळताच सहजच गूगल वर त्याचे नाव शोधले आणि त्यांची माहिती वाचून चकीतच झाले. त्यांचा हुद्दा किती मोठा आहे हे कळले, त्यांनी प्राप्त केलेल्या विविध मान सन्मानाचे फोटो होते. त्यांचे पद म्हणाल तर ते 'व्हाईस चीफ इंडियन नेव्ही' असं लिहिलेले होते. म्हणजे आपण विचार करू शकतो की किती मोठ्या पदावर बाबांचा हा पुत्र भारत मातेची सेवा करत आहे. त्यांचा पाहुणचार करण्याचं भाग्य मला मिळालं होतं. तेही ईश्वराच्या घरातून! ह्या विचारानेच खूप खूप आनंद झाला. वाह रे मी! आणि ह्याच परम आनंदात गेल्या काही दिवसांतील अनेक गोष्टी आठवल्या, जणू काही शिक्का मोर्तबच झाले की मन नेहमी शांत ठेवावे. शांततेच्या डोहामध्ये आपल्याला हवे असते त्यापेक्षा कितीतरी उत्तुंग असे काही परमेश्वराने आपल्यासाठी हेरून ठेवलेले असते, ते आपल्या समोर कधी येऊन उभे राहतील कळतही नाही!

त्यानंतर मी सतीश भाईंशी फोनवर सविस्तर बोलले. त्यांनी सांगितलं की मी टोकियो मध्ये इंपिरियल हॉटेलमध्ये उतरलो आहे. इंपिरियल हॉटेल जपानमध्ये आंतरराष्ट्रीय सरकारी दरबारातून आलेल्या अधिकाऱ्यांची राहायची व्यवस्था करते. सतीश भाई हे भारत सरकारतर्फे काही राजकीय संदर्भात चर्चा करण्यासाठी आले होते.

टोकियोमधील ३-४ दिवसांमधील मुक्कामामध्ये त्यांच्या बरोबर त्यांचे सहकारी एयर मार्शल बी.आर.कृष्णा होते. अपूर्वा बॅनर्जी ह्या जपानी, इंग्रजी आणि हिन्दी दुभाषी म्हणून आल्या होत्या. या सर्वांचा पाहुणचार करण्याची सेवा होती. मला राहून राहून आश्चर्य वाटत होते की हे किती मोठे व्यक्तिमत्व आहे लौकिक आणि अलौकिक अर्थाने ते भारत मातेची सेवा करत आहेत आणि मी ह्या महान लोकांना ईश्वरी दरबारात घेऊन जात आहे.

मी ठरल्याप्रमाणे सकाळी ९:३० वाजता इंपिरियल हॉटेल मध्ये गेले. मला असे वाटत होते की ते कसे असतील? कसे वागतील माझ्याशी? नीट बोलतील का? पण जेव्हा सतीशभाई अतिशय साध्या पण नीट-नेटक्या ब्र.कु. विद्यार्थी पोशाखात म्हणजेच पांढरे कपडे आणि जॅकेट मध्ये पहिले तेव्हाच जाणवले अरे हे तर आपले भाई आहेत आणि माझ्या वर असलेले दडपण कुठल्या कुठे पळून गेले! म्हणतात ना ''साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'' याचा प्रत्यय आला त्यांना बघून. ओमशांति च्या अभिवादनाने आमच्या संभाषणाची सुरवात झाली. मी जेव्हा सतीश भाई आणि सोबत आलेल्या कृष्णाजींना म्हणाले की तुम्ही दोघे भारतमातेची इतकी मोठी सेवा करता. आज मला तुमच्या सेवेसाठी शिवबाबांनी पाठवले आहे. तेव्हा अय्यर मार्शल कृष्णाजी म्हणाले, ''तुमची ही सेवा तेवढीच महान आहे कारण तुम्ही मानवतेची सेवा करता.'' त्यांचे बोलणे ऐकून वाटले की हे लोक स्वतः प्रमाणे इतरांनाही तेवढाच मान सन्मान देतात. मला ह्या गोष्टीचा खूपच आनंद झाला. सतीश भाई, कृष्णाजी आणि अपूर्वा बॅनर्जी या सर्वाना घेऊन मी टोकियो सेवाकेंद्रावर आले. तेथे पोहोचताच तेथील अलौकिक वातावरणाचा अनुभव त्यांना किती संपन्न करत होता हे त्यांच्या चेहऱ्यांवरून काळत होते. योगकक्षामध्ये सर्वांनी योगाची अनुभूती देखील केली. सेवाकेंद्रावर राहणारी बहीण मिजुएदीदी गेली २४ वर्ष तन, मन आणि धनाने सेवा देत आहेत. गप्पांमधून कळत गेले की किती महान कार्य ही मंडळी करत आहेत. जेव्हा पंतप्रधान मोदीजींनी आय.एन.एस विक्रांत या युद्धनौकेचे उदघाटन केले तेव्हा सतीश भाई आणि कृष्णाजी हे दोघे युद्धनौकेवर उपस्थित होते.

मिजुएदीदीने सर्वांसाठी सकाळच्या न्याहारीची उत्तम व्यवस्था केली होती. गप्पांमध्ये त्यांच्या कार्याव्यतिरिक्त ईश्वरी ज्ञानाची देवाण घेवाण झाली. सतीश भाई जरी नियमित विद्यार्थी असले तरी कृष्णाजी आणि अपूर्वा बॅनर्जी हे दोघे प्रथमच सेवाकेंद्राला भेट देत होते. जेव्हा मिजुएदीदी सद्भावनापूर्वक ज्ञान देत होत्या, अखंड शांतता स्थापनेसाठी ईश्वराचे भारतात आगमन झाले आहे हे त्या सांगत होत्या, तेव्हा जाणवत होते की त्यांच्या वर खूप छान प्रभाव पडला आहे. हे ईश्वरी ज्ञान एका परदेशी व्यक्तिकडून ऐकणे ते पण भारत देशाची संस्कृती आत्मसात करून याचे कौतुक त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

अशा प्रकारे अतिशय आध्यात्मिक आणि शांतिपूर्ण वातावरणात सतिशभाईनी सर्वांचे आभार मानत छत्रपती शिवरायांचे सागरी झेंडा असलेले पवित्र मानचिन्ह मिजुएदीदीना भेट दिले. ह्या मानचिन्हाचे महत्त्व विशद करताच सर्वजण खूपच भारावून गेले, त्याचबरोबर सेवेसाठी प्रज्ञा बहेन-ठाणे), अवंतिका बहेन आणि ईकीको बहेन (जपान-टोकियो) तत्पर होत्या. ब्रह्माभोजनाचा लाभ तुम्हा बहीणींमुळे ग्रहण करता आला असे म्हणून तिन्ही पाहुण्यांनी सर्वांचे आभार मानले मग त्यांनी पुढील प्रवासासाठी प्रस्थान केले.

तात्पर्य काय तर ही सेवा अतिशय पवित्र, शुद्ध वातावरणात बाबांनी आम्हा सर्वांना निमित्त बनवून करवून घेतली. कुठेही धांदल नाही अतिशय सहजतेने पार पडली. अशा वेळेस समजते की अशी सेवा मनाला किती आनंद आणि स्थिरता देऊन जाते. ह्या सेवेतून जणू काही एक संदेशच मिळाला की कोणत्याही प्रसंगात घाबरून न जाता शांतपणे जर स्वसेवा करत धीर धरला तर बोगद्यातील तो अंधाराचा प्रवास संपून नव्या सेवेचे किरण नक्कीच दिसू लागतात. शांत, सुखी, समाधानी राहिल्यास आध्यात्मिक जीवनातील एकेक पायरी आपण स्वानुभवासहित चढत जाऊ शकतो ह्यात शंकाच नाही!

***



# कर्मेन्द्रियांचा दरबार

## (एक नाटिका)

ब्र.कु. दीपाली, लोणावळा

नाटक, मालिका, चित्रपट तुम्ही खूप काही पाहिले असतील. जुन्या काळची राजामहाराजांची सभा आपण वाचली, पाहिली किंवा ऐकली असतील. राजवाडा, राजाचे सिंहासन, राजाचे मंत्रिगण आणि प्रजा अशी सभा आपण बघतो अशीच एक सभा 'आत्मा राजा आणि त्याच्या कर्मेंद्रियाची आहे.' या सभेत आत्मा राजा आहे, मन मंत्री आहे आणि बुद्धी न्यायाधीश आहे.

नाटकाचा पडदा बाजूला होतो आणि घोषणा होते –

''सावधान आत्मा राजा, भ्रुकुटी सिंहासनावर विराजमान होत आहे हो...''

अजून एक घोषणा होते.

''कर्मेंद्रियांचा स्वत:वर ताबा नाही अशी तक्रार मनमंत्रीने राजाकडे केली आहे.''

नाटकाची सुरुवात –

**मनमंत्री :–** महाराज, सर्व इंद्रिये विषयभोगाच्या सुखाकडे धावत असल्यामुळे, शरीर प्रकृतीचे नुकसान होत आहे आणि आपल्या राज्याची हानी होऊन राजधानी लयाला गेली आहे. म्हणून आजची सभा भरवण्याची गरज पडली आहे.

**आत्माराजा :–** मनमंत्री महोदय, कुणावर आरोप करण्याआधी सर्व इंद्रियांचे म्हणणे काय आहे याची आम्ही पडताळणी करू इच्छितो.

**मनमंत्री :–** जशी आपली आज्ञा महाराज.

१) डोळ्यांना उभे केले जाते.

**डोळे :–** महाराज, या आधुनिक जगात इतक्या गोष्टी मोहन आहेत, आकर्षक आहेत, त्या मला सुखावतात आणि मला त्या मोहात टाकतात. जर अशा मोहून टाकणाऱ्या वस्तूंकडे माझे लक्ष जाते, तर त्यात माझा काय अपराध आहे.

**महाराज :–** मनमंत्री, महोदय तुमचे काय म्हणणे आहे ?

**मनमंत्री :–** महाराज, ''डोळ्यांच्या या मोहामुळे शरीरसंपत्ती आणि वास्तविक संपत्तीची हानी होत आहे.

२) कानांना दरबारात उभे केले जाते.

**कान :–** चित्रपटांची गाणी, नाटक, गप्पागोष्टी परनिंदा, चोरून ऐकणे हा माझा छंद आहे. माझा छंद मी जोपासणारच असा माझा निश्चय आहे.

**मनमंत्री :–** पण महाराज, कान इंद्रियांच्या या नको त्या छंदामुळे बुद्धिपटलावर नको त्या गोष्टी कोरल्या जाऊ लागल्या आहेत.

**महाराज :–** मनमंत्री याच्यावर विचार केला जाईल.

३) मुखास बोलवले गेले.

**मुख :–** चटरपटर गप्पा मारणे, निंदा–स्तुती करणे, कौतुकाचे दोन शब्द बोलणे, जीभेवर ताबा न ठेवता, बेलगाम शब्दरूपी घोडा उधळणे, अशा कितीतरी गोष्टी करणे, यातच मला आनंद मिळतो.

**मनमंत्री :–** महाराज, मुख इंद्रियाच्या या सवयींमुळे खूप सहयोगी दुखावले गेले आणि राज्याच्या शत्रूसंख्येत वाढ झाली आहे.

४) जीभेने आपला तोरा गिरवला.

**जीभ :–** मी जर हलले नाही, तर माझ्या सोबती मुखाला मला साथ देता येणार नाही आणि गुलाबजाम बघितल्यावर मला पाणी सुटले नाही तर माझा काय उपयोग ?

**मनमंत्री :–** महाराज जीभेच्या या वागण्यामुळे मुखाने आपले शत्रू तर वाढवलेच; पण खाण्याचा अतिमोह आणि फास्टफुड यामुळे शरीरप्रकृतीत वेगवेगळ्या विकारांनी आणि आजारांनी प्रवेश केला आहे आणि त्यातल्या काही आजारांना आता उपायच शिल्लक नसून राजधानी जीर्ण–शीर्ण झालेली आहे.

तसेच महाराज कर्मचारी हातांनी तर आपल्या लहान

वारसदारांना मारण्याचा गुन्हा केला आहे आणि पायांनी. सगळी दुकाने-मॉल शॉपिंगसाठी पालथी घालून वास्तविकतेची सीमा ओलांडली आहे.

महाराज या इंद्रियांना वेळीच शिक्षा नाही केली, तर या शरीर प्रकृतीची हानी तर होतच आहे, शिवाय असुंतष्टतेने राज्यात प्रवेश केला आहे. म्हणून राज्याची सुखशांती भंग पावली आहे.

**महाराज :-** मनमंत्री महोदय, कर्मेन्द्रियांनी सांगितलेले म्हणजे आणि आपण केलेल्या राजधानीचं नुकसानाचे वर्णन ऐकून मी हा निर्णय बुद्धी न्यायाधीशाकडे सोपवत आहे.

**बुद्धीन्यायाधीश :-** इंद्रियांच्या या सवयींमुळे महाराज बुद्धीवर वाईट संस्काराचा गंज चढल्यामुळे सगळीकडे अज्ञानाचा अंधकार पडला आहे, त्यामुळे राज्याचा प्रकाश दूर होऊन शक्ती क्षीण झाली आहे.

या सगळ्यांचा विचार करता सर्व कर्मेंद्रियांना वेळीच बंधने घालणे गरजेचे आहे. सत्संग आणि आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. राज्याच्या सुखशांतीसाठी कर्मेंद्रियजीत होतो हीच सर्वात मोठी गरज आहे, प्रकृतीचा विषय आणि पुरुषार्थ हाच एकमेव उपाय आहे.

बुद्धीने आपला निर्णय सांगितला आणि राज्यसभा बरखास्त झाली. आत्मा राजाने राजयोगाची कास धरली. राजयोग आणि नित्य ज्ञान मुरली श्रवणाचा उपाय हळूहळू लागू पडू लागला. आता कर्मेंद्रिये पूर्वीसारखी चंचल होत नाहीत. विजयाची आशा दृष्टीक्षेपात येऊ लागली आहे.

***

---

(पृष्ठ क्र.४ वरुन)

परिवारातील भावा-बहिणींच्या सेवेची जबाबदारी तसेच दिल्ली हे राजधानीचे शहर असल्यामुळे तिथे असलेल्या सरकारी कार्यालयीन सेवेची जबाबदारीही त्यांच्यावर होती. पण त्यांना या सर्व गोष्टींचा कधीच काही ताण जाणवला नाही. दादी सदैव निर्विघ्न, निश्चिंतच असायच्या. सृष्टीचक्रातल्या प्रत्येक अटळ घटनेबाबत, त्या स्थिर असत. सर्वांना त्या आपल्या मधूर वाणीने सांगत असत की, 'झाले गेले ते सगळे विसरून आता पुढे चला.' परत परत त्याच जुन्या गोष्टींचा ऊहापोह करू नका.

जर आपले दादींवर जीवापाड प्रेम असेल तर, दादींनी सर्वांना सांगितलेल्या अतीगुह्य गोष्टी आपण आपल्या जीवनात धारण करायला हव्या. गुलजार दादी सर्वांना अतिशय प्रेमाने, विनम्रतेने भेटायच्या. दादीजी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जणांच्या कायम स्मरणात राहतील अशी छाप सोडून गेल्या. दादींनी बाबांसारखे संपूर्ण बनण्याचे मूर्तीमंत उदाहरणच आपल्यासमोर ठेवले आहे. आपण सर्वांनी दादींच्या पावलावर पाऊल ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून आपण प्रगती साधली तर ती आपल्यातर्फे दादीजींना दिलेली खरी मानवंदना ठरेल.

***

---

## सुविचार

'नको रे मना क्रोध हा खेदकारी' हे आपण भक्तीमार्गात वाचले, अभ्यासले. पाच विकारातील क्रमाने काम, क्रोधानंतर लोभ येतो आणि शेवटी अहंकार येतो. क्रोध आला की लोभही येतो. फक्त भौतिक गोष्टींचा लोभ एवढी मर्यादित व्याप्ती नाही. कुठलीही सूक्ष्म इच्छा असणे हाही लोभाचा अंश आहे असे शिव परमात्मा सांगतात आणि लोभाचे प्रकट रुप असलेल्या इच्छा पूर्ण नाही झाल्या की क्रोध येतो. राजयोगाच्या नित्य अभ्यासाने या गोष्टींवरील विजय साध्य होऊ शकतो.

(आधार - अव्यक्त वाणी ३.४.१९९७)



# "शिवबाबा : माझा पाठीराखा"

## (भाग २)

## विहीरीची काळजी बाबाला

ब्र.कु. बापू , कोल्हापूर

**शेतकरी कुटुंबात जन्मलेले कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगावचे रहिवासी ६५ वर्षीय बापूभाई अखंड ब्रह्मचारी ब्रह्माकुमार आहेत. त्यांना आजवर आलेले ईश्वरी अनुभव थक्क करणारे आहेत. आपणा सर्वांसाठी क्रमश: प्रसिद्ध करत आहोत...**

एकदा आपण जर बाबाला आपले मानले तर बाबा आपल्याला कधीही एकट्याला सोडत नाही हे मात्र खरे आपलाही त्याच्यावर हक्क चालतो. पुंडलिकाने याच अधिकाराने त्याच्या परब्रह्माला त्याच्या आवडत्या विठूरायाला एका वीटेवर उभे राहण्यास भाग पाडले. बाबा तर माझ्या घरी माझ्या मातेची देखभाल करायला धावून आला होता. तो कोणत्या रूपात येईल किंवा सावलीच्या रूपात सावलीसारखा येईल आणि मुलाला मदत करून जाईल सांगता यायचे नाही. ज्ञानमार्गात येऊन मला सात आठ वर्षेझाली होती. वीस बावीस वर्षेमाझे वय झाले होते. नातेवाईकांकडून विवाह बंधनात अडकवून मला गृहस्थाश्रमात आणण्याचे खूप प्रयत्न झाले. परंतु बाबांच्या ज्ञानाच्या अभेद्य कवच रक्षणामुळे ब्रह्मचर्याचे माझे ब्रीद सुरक्षित राहिले.

तथापि घरची शेतीवाडी आणि गाई गुरे यांचा व्याप मला चुकला नव्हता. ज्ञान, योग, धारणा आणि सेवा यांची माझ्या हातून पराकाष्ठा होत होती. अशा परिस्थितीत मला कोल्हापूरला दुधाचा रतीब घालायलाही जावे लागे. माझी गुरे कुठे चरत असतील याची मला काळजी नव्हती. सगळी चिंता मी माझ्या शिवबाबावर सोपविली होती.

मी कोल्हापूरला दूध घालायला जायचा. परत यायला कधी कधी वेळ व्हायचा. माझी जनावरे चरत - चरत दूर डोंगरात जायची. त्यांची काळजी माझ्या शिवबाबालाच होती. एकदा जनावरे घरी यायला फारच वेळ झाला. मला क्षणभर चिंता वाटू लागली. मी म्हणालो, बाबा तूच आता माझ्या जनावरांचा गुराखी. माझी जनावरे तूच आता घेऊन येणार आणि अर्ध्या तासात माझ्या सगळ्या गाई म्हशी हंबरत गोठ्यात आल्या.

एकदा बाबावर आपली जबाबदारी सोपविली की मग चिंता कशाला! २००० सालची गोष्ट आहे. त्याआधी वर्षभरापूर्वी आमच्या रानात विहिरीची खोदणी मी केली होती. विहिरीला पाणी लागले होते. पण माझी आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे विहिरीला मी काँक्रिटची रिंग बसवू शकलो नव्हतो. काँक्रिटची रिंग टाकली नाही तर पावसाळयात माती वाहून विहीर बुजून जाण्याची शक्यता होती. मला विहिरीची चिंता वाटत होती. १५' बाय १५' विहिरीची २० फूट खोली होती. खर्च किती येईल हे विचारायला मी एका कंत्राटदाराकडे गेलो. त्याने मला रिंग टाकण्यासाठी एक लाख चाळीस हजार रूपये खर्च येईल म्हणून सांगितले. माझ्याकडे तर उणेपुरे सत्तर हजार रूपये होते.

मग एके दिवशी अमृतवेळेला शिवबाबांसमोर मी माझा संकल्प मांडला. मी म्हणालो, 'बाबा तुझ्या बच्च्याने कशीबशी विहीर खोदली आहे. पुढची जबाबदारी आता तुझी  आणि दुसरे दिवशी मी माझ्या मामाच्या गावी गेलो. त्याचा मुलगा बांधकामाची कंत्राटे घेत होता. त्याच्यापुढे मी आमच्या विहिरीच्या काँक्रिटच्या रिंगच्या कामाचा प्रस्ताव ठेवला. मी त्याला म्हणालो.हे बघ मी जेसीबीच्या मदतीने विहिरीची खुदाई केली आहे. त्याला वीस हजार रूपये खर्च आला आहे. आता पुढचे काम कसे करायचे ते तू बघ. त्यावर तो म्हणाला, काळजी करू नका. मी पुढच्या आठवड्यात कामाला सुरूवात करतो. आणि त्याने कामाला

(पृष्ठ क्र.२४ वर)

# परीकथा

## (भाग ८)

# शिव आणि शंकर यामधील फरक

ब्र.कु. रेखा, देगलूर



एक मोठी चूक : परमात्मा सर्वव्यापी नाही परंतु सर्वज्ञ आणि सर्व शक्तिमान आहे

मागच्या काही भागात मी तुम्हाला माझ्या राधेच्या स्वप्नातल्या परीची बरीच कथा सांगितली. मागील पानावरून पुढे सुरू म्हणतात ना त्याप्रमाणे आता पुढील घटनाक्रम सांगते. आम्ही सर्वजण गावीच होतो आता आणखी पाच ते सहा दिवस गावाकडेच राहणार होतो. राधाच्या मामाची फुलाची बाग खूप सुंदर होती आम्ही ती पाहून आलो. आम्ही सर्वजण बागेत खूप धमाल केली होती. सर्व पाहून शेतात जेवण वगैरे करून झाडाला बांधलेला खूप सुंदर झोका होता.

त्या झोक्यावर खूप मस्त वाटत होतं खूप उंच जात होता तो झोका संध्याकाळी आम्ही सर्वजण घरी परतलो. खूप थकलो होतो राधा व तिचा दादा दोघेही आता पेंगू लागले होते. लवकरच आम्ही सर्वजण शांत झोपी गेलो.

सकाळचं गावाकडचं वातावरण खूपच वेगळं असतं तिथे सर्वजण सकाळी लवकर उठतात; पण शहरातल्या चाकरमान्यांसारखी गाडी पकडायची लगबग नसते. सडा रांगोळ्या खूप छान काढतात सगळीकडे वातावरण खूप प्रसन्न असते. मी राधेला उठवण्यासाठी गेले होते परंतु राधा उठून तिच्या बहिणी सोबत खेळत होती. मी राधेला म्हणाले राधा बाळा आज आपल्याला घरी परत जायचं आहे बघ! ती व तिचा दादा खूप नाराज झाली होती कारण त्यांना आणखी दोन दिवस तरी राहायचं होतं खूपच सर्वांनी आग्रह केला तेव्हा मात्र तिच्या बाबांनी एक दिवस राहायची परवानगी दिली. सर्वजण खूप खुश झाले तेवढ्यात मामाकडे शेतातला एक कामगार धावत धावत आला होता. तो मामाला म्हणाला, ''मालक आपल्या शेतातल्या (कुत्रा) खंड्याने एका मुलाला चावलं मामा म्हणाले त्याला लवकर आपण दवाखान्यात घेऊन जाऊया. ते सर्वजण घाई घाईने शेताकडे गेले मामाची मुलगी तेवढ्यात म्हणाली, ''अय्या! तो कसा काय चावला! त्याची तर आम्ही देवासारखं दरवर्षी खंडोबा म्हणून पूजा करतो. हार घालतो सर्व काही करतो.'' राधा तेवढ्यात म्हणाली, ''नाही कुत्र्यात सापात किंवा कुठेही देव नसतो.'' स्वरा म्हणाली, ''तुला काय माहीत? असे म्हणतात देव तर सगळीकडे असतो.'' राधा म्हणाली, ''तुझं बरोबर आहे; पण काल रात्रीच माझी परी मला स्वप्नात येऊन सांगत होती. हे सर्व काही तिनेच मला सांगितले आहे. सकाळी उठले ; पण मला आठवणच राहिली नाही बघ.'' पण आता लक्षात आलं तेवढ्यात स्वरा व तिची बहीण माझा दादा जवळ येऊन राधाला मोठ्या उत्सुकतेने विचारू लागली, ''राधा परी खरंच तुझ्या स्वप्नात आली होती का ग! तिने कोणती गोष्ट सांगितली? आम्हाला सांग ना!'' राधा गोड शब्दात सांगू लागली, ''परी म्हणाली परमात्मा अथवा देव सर्वव्यापी आहे असं सर्वजण म्हणतात. ही फार मोठी चूक आहे. मी परीला लगेच विचारले, अग आम्ही तर सापाची झाडाची अजून अनेकांची पूजा वेगवेगळ्या निमित्ताने करतो. त्यांच्यात परमात्मा नसतो का गं!'' परी सांगू लागली, ''बाळा मला सांग परमात्मा जर सर्वव्यापी आहे तर मग आपण त्यांची पूजा शिवलिंग रूपात का करतो? तो जर सर्वत्र असेल तर त्याचा दिव्य जन्म कसा काय होऊ शकतो? बाळा दुःखी कष्टी झालेले लोक परमेश्वरा या धरतीवर लवकर या आम्हाला सर्वांना दुःखातून सोडवा ही प्रार्थना का करतात?'' मी परीला म्हणाले, ''परी हे सर्व तुझं बरोबर आहे मग प्राण्यात नदी झाड यांच्यात परमात्मा नसतो का?'' परी म्हणाली, ''सर्व मनुष्यांनी हीच तर एक मोठी चूक केली आहे की परमात्मा सर्वव्यापी, कणाकणात आहे कुत्र्यात, झाडात सापात इत्यादी प्रत्येकातच परमात्मा पहा. राधा मला सांग परमात्मा जर सापात कुत्र्यात असतात तर तो आपल्याला

चावला असता का? एकीकडे आपण म्हणतो देव सुखकर्ता आहे मग तो असे दुःख देण्याची क्रिया करू शकेल का याचा विचार कर बरं.''

''बाळ राधा आपण परमात्म्याला झाडात, पानात, फुलात पाहतो आणि ती झाडे आपण उद्ध्वस्त पण करतो आणि आत्मा परमात्मा एकच आहे असेही काही जण म्हणतात. परंतु स्त्रियावर अत्याचार, लहान मुलांना पळवून नेणे चोऱ्या माऱ्या करणे असे अनेक गुन्हे मानव का करतो ? ही कृत्ये देवाची असू शकत नाहीत. जर परमात्मा सर्वात असता तर असे आपण वागलोच नसतो.'' राधा परीकडे पाहतच राहिली परीच्या जवळ जाऊन म्हणाली, ''परी तुझीही जादूची कांडी मला देशील का ग किती मज्जा येईल मला परी म्हणाली, तुझ्या हातात धर एकदा. मी परीची जादूची कांडी हातात धरल्यावर खूप छान वाटत होतं. ते स्वप्न कधी संपूच नये असं वाटत होतं, जादूची कांडी हातात धरून परीला मी अशी घट्ट मिठी मारली. जादूची कांडी हातात घेतल्यामुळे माझ्या आनंदात आणखी भर पडली होती परीने माझा निरोप घेऊन लगेच ती दिसेनाशी झाली.'' आणि मला एकदम जाग आली मी माझ्या हातात जादूची कांडी कुठे आहे ते पहातच होते पण मला नंतर लक्षात आलं की ते स्वप्न होतं. मी सकाळी तुम्हाला माझी गोष्ट सांगणार होते. पण तुम्ही भेटलाच नाही म्हणून मी विसरून पण गेले. मग ती एक हलका श्वास घेऊन शांत बसली. तेवढ्यात सर्वजण घरी पोहोचले होते बाबाजवळ आम्ही सर्वजण गेलो मी बाबाला लगेच विचारले, ''बाबा तो कुत्रा चावलेला मुलगा कसा आहे हो ? काल तो आमच्यासोबत दिवसभर खेळत होता.'' त्यावर स्वरा धावत बाबाकडे जात म्हणाली, ''तो आमच्या बाजूलाच राहतो त्याचं नाव कृष्णा आहे. बाबांनी सर्व मुलांना जवळ घेत म्हणाले, बाळा तो आता एकदम चांगला आला आहे. आम्ही त्याच्या घरी त्याला सोडून आलो. त्याची आई खूप अस्वस्थ होती. तो ठीक आहे हे पाहून तिची अस्वस्थता कमी झाली.'' राधा बाबांच्या जवळ जाऊन म्हणाली, ''बाबा स्वरा म्हणत होती कुत्र्यात, सापात, झाडात सर्वात कणाकणात परमेश्वर आहे. परंतु बाबा मी तिला माझ्या परीची गोष्ट परमात्मा सर्वशक्तीमान आहे; परंतु सर्वव्यापी नाही. ही परीची गोष्ट सांगितले बाबा बरोबर आहे ना हो!'' बाबा म्हणाले, ''बाळांनो परीनी जी कथा सांगितली आहे ते अगदी बरोबर आहे. यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत... बाळा हा गीतेचा श्लोक आहे यात असं स्पष्ट सांगितलं आहे की जेव्हा जेव्हा धर्माची अति ग्लानी अधर्म खूप वाढतो म्हणजेच भांडण मारामारी अत्याचार अति होईल तेव्हा परमात्मा स्वतः या धरतीवर अवतरीत होऊन हा अज्ञान अंधकार दूर करतात. अधर्माचा नाश करून एक सत्य धर्माची स्थापना करून सर्वांना सुखाचा मार्ग दाखवतात. यावरून असं सिद्ध होते की परमात्मा हा सर्वव्यापी नाही. आणि हो बाळा ऋषीमुनी संत इत्यादी जेव्हा जेव्हा परमात्म्याची भक्ती करत होते तेव्हा तेव्हा त्यांची भावना शुद्ध होती. त्यामुळे जसा भाव तसा देव किंवा जेथे भाव तेथे देव. संत-मुनिजनांचे देवावर निरतिशय प्रेम असल्याकारणाने त्यांच्या मन-बुद्धीरूपी डोळ्यांना ते रूप दिसत होते. त्याचा शब्दशः अर्थ घेतल्याने गडबड झाली आणि जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी परमेश्वर अशी समजूत दृढ होत गेली.''

''या देशावर अनेक परचक्रे आली. ज्याने त्याने आपापल्या धर्मप्रथांचा विचार समाजात रेटायचा प्रयत्न केला. त्यातील एक भाग म्हणजे गायीचा वध करणे, लोकांच्या पूजेत गोमांस आणून विघ्न निर्माण करणे असेही घडले. यावर उपाय म्हणूनही संतांनी सांगितले की प्राणिमात्रातही देव आहे. त्यांना मारू नका. त्यामागचा उद्देश होता- मुक्या जनावरांवरचे अत्याचार थांबवावे. हा खूप मोठा आणि सखोल विषय आहे मुलांनो. तुम्ही थोडं मोठं झाल्यावर हे सगळं अजून स्पष्ट होईल तुम्हाला.''

''आपण परमात्म्याला कुठेही कशाही परिस्थितीत आठवण केली तर तो आपल्याला मदतच करतो त्याच्या अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष मदतीचा अनुभव येतो. याचाच अर्थ परमात्मा सर्वव्यापी आहे असा अनेकांनी लावला आहे. बाळा परमात्मा सर्वव्यापी असता तर या दुःख अशांतीपासून आम्हाला सोडव अशी प्रार्थना आपण का करतो ?'' एवढे बोलून बाबा थांबले. स्वरा म्हणाली, ''मामा तुम्ही किती छान सांगितला हो. आम्हाला या सर्व गोष्टी मला खूप आवडल्या बघा.'' बाबांनी सर्व मुलांना जवळ घेऊन त्यांच्या गालावरून हात फिरवून म्हणाले, चला आपण आता जेवण करू या! मामी हाक मारत होती. स्वरा वगैरे सर्वजण म्हणाले, ''मामा किती छान सांगितलं हो तुम्ही! आता मला पटलं की परमात्मा सर्वव्यापी नाही.'' मग

(पृष्ठ क्र.२४ वर)



# खुदा दोस्त

ब्र.कु. माधुरी, ठाणे

दोस्त, सखा, मित्र किती सुंदर नाते आहे या शब्दांत! पण मित्र कसा असावा हा एक प्रश्नच? मैत्री तर सर्वांशीच होते वा आपण करतो. पण खरा जीवलग मित्र तो निराळाच! आणि खुदा दोस्त आपला झाला तर? हो आश्चर्य वाटले ना! बंधू-भगिनींनो हाच तो संगमयुगी काळ आहे. यावेळी स्वतः परमात्मा ब्रह्मा तनाच्या आधारे आपला खुदा दोस्त होऊन शेकहॅण्ड करत आहेत.

जीवनात प्रत्येकाला खऱ्या मित्राची, जीवलग मित्रची आवश्यकता असते आणि माझ्या जीवनात ती गरज पूर्ण केली स्वतः परमात्म्याने हो! एक मित्र म्हणून मी परमात्म्याचा स्वीकार केला. ब्रह्माकुमारी झाल्यानंतर मला माझा खुदा (परमात्मा) दोस्त म्हणून मिळाला आणि जीवनात आनंद व खऱ्या मित्रांची जागा शिवबाबांनी घेतली. प्रथम मी माझ्या या मित्राचे आभार मानते की, त्यांनी मला आपला मित्र बनविण्यास योग्य समजले व मित्र म्हणून निवड केली. नाहीतर कुठे सुदामा व कुठे श्रीकृष्ण; पण श्रीकृष्णाने सुदाम्याला कधीही अंतर न देता आपला सखा व मित्र मानले व मित्रत्व निभावले. अगदी हो! तसेच परमात्मा (शिवबाबा) या धरतीवर ब्रह्मातनाच्या आधारे अवतरित होतात व सर्व संबंधातून प्रेम देतात आणि तोच अनुभव अत्यंत आनंददायी, प्रेरणादायी, शक्तीदायक पवित्रता दायक असा आहे. आजपर्यंत भक्तिशी निगडीत ऐकले होते.

मम मनी कृष्ण सखा रमला<br>
नच रणी आप्तवधा सजला।।१।।<br>
नवल नाही नच दृश्य इतरां झाला ---

शिवबाबा माझे खरे मित्र झाले. आतापर्यंत मी सगळ्यांशी मैत्रीनेच वागायचे; पण खरी जीवलग मैत्री मी कोणाशीही केली नव्हती. मित्रांजवळ आपण मनातील साऱ्या भावना निर्धास्तपणे व अगदी मोकळेपणाने मांडू व सांगू शकतो. पण आजच्या काळात अशा जीवश्च कंठश्च जीवलग मित्र मिळणे दुर्मीळच! कारण मित्र हा सर्व बऱ्या-बाईट (अवगुण-गुण) गोष्टी समजून घेणारा, प्रसंगी योग्य मार्ग दाखविणारा, सर्व परिस्थितीत साथ देणारा, मैत्री निभावणारा असा असावा लागतो. महाभारतात कृष्ण आणि अर्जुन हे नातं सखारूपात दर्शविले आहे. त्याचप्रमाणे द्रौपदी आणि श्रीकृष्णाचेही मित्रत्वाचे गहिरे नाते वर्णिले आहे. मीही तशाच नाते संबंधाचा अनुभव घेते.

शिवबाबा तर खरे मित्र आहेत. त्यांच्यापुढे आपल्या मनातील भावना मी सहज व्यक्त करू शकते. या मित्राने मला वाटाड्या बनून जीवनात कितीदा योग्य वाट दाखविली. काही चुका होत असतील तर मुरलीच्या (परमात्मा महावाक्य) आधारे लगेच चुकांची दुरुस्ती केली. मी नोकरी निमित्त बराच लांब प्रवास करायची कधी एकटीनेच प्रवास करावा लागे. तेव्हा शिवबाबांना मित्र म्हणून मी सोबत ठेवायची. एक मित्र म्हणून शिवबाबांकडून मिळणारे प्रेम, मार्गदर्शन यांची तुलना करूच शकत नाही. कारण परमात्मा स्वतःच मित्र होऊन ते देत आहेत. हा अनुभव खूप हृदयस्पर्शी व रोमारोमात शक्ती भरणारा असाच आहे.

शिवबाबांना कुठलाही आडपडदा न ठेवता मनातले सारे काही सांगता येते कारण शिबबाबा (परमात्मा) सर्व शक्तिमान, दयेचा सागर असल्याने त्या भावना किंवा गोष्टी पसरण्याची भीतीच नाही. उलट योग्य मार्ग मिळून शक्ती मिळते म्हणूनच शिवबाबांशी मैत्रीचे अतुट नाते जुळले. आज २६ वर्षेझाली मी शिवबाबांना खुदा दोस्त या नात्याने नेहमी सतत माझ्या सोबत ठेवते. तो खुदा दोस्त तरी किती दयाळू व प्रेमळ की तो प्रत्येक प्रसंगात मला मदत करतो.

मित्र हा आपला खरा आधार असतो आणि तो मला शिवबाबांच्या रूपाने मिळाला. आज सगळे जग

(पृष्ठ क्र.२६ वर)



# बी पॉजिटिव्ह अर्थात "सकारात्मक बना"

बी.के. भगवान, शांतीवन आबू रोड

वर्तमान वेळी दुनियामध्ये अनेक शैक्षणिक संस्था असूनही समाजामध्ये अपराध, समस्या हे वाढतच चाललेले आहेत. याचे मूळ कारण म्हणजेच मनातील सकारात्मक विचारांची उणीव सध्याची शिक्षण पद्धती फक्त पोट भरण्यासाठी किंवा भौतिकता प्राप्त करण्यासाठी राबविली जाते. शैक्षणिक संस्थेमध्ये शिकल्यानंतर आपण चांगल्या गुणांनी उत्तीर्ण तर होतो परंतु जीवनात येणाऱ्या परीक्षेत धांदल उडते. शिक्षण घेतल्यानंतर सुद्धा संस्कार आणि संस्कृतीपासून आपण दूर जात आहोत. लहान मुलापासून युवा आणि वृद्धापर्यंत नकारात्मक विचारामुळे दिवसेंदिवस तणाव हा वाढतच चाललेला आहे. त्यामुळे शारीरिक, मानसिक, समस्या वाढतच चाललेल्या आहेत.

नकारात्मक विचारांचा अंधकार मिटविण्याचे कार्य स्वतः निराकार परमपिता परमात्मां प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून गेली ८० वर्षापासून १४० देशात करीत आहेत. या ईश्वरीय विश्व विद्यालयामध्ये आपण कोण? कोठून आलो ? जीवनाचे खरे उद्दिष्ट काय? कर्माच्या गुह्य गतीचे ज्ञान, संसारचक्र प्रत्येकाची वेगवेगळी भूमिका काय आहे इत्यादी गुह्य ज्ञान आणि सहज राजयोग नित्य शिकविला जातो त्यामुळे मनाला सकारात्मक विचारांची गती येते आणि विपरीत परिस्थिती मध्ये सुद्धा आपण तणावापासून सुरक्षित सुख-शांतीचा अनुभव करू शकतो. एक तासाच्या या सकारात्मक विचारांमुळे आणि राजयोग अभ्यासामुळे दिवसभर आपल्या मनामध्ये सकारात्मक विचारांचा झरा वाहू लागतो. त्यामुळे आपला वर्तमान वेळ सहजच सफल होऊन भविष्यसुद्धा सहजच सुखी बनून जातो.

म्हणूनच वर्तमान वेळी विपरीत परिस्थितीमध्ये सुद्धा स्वतःला सकारात्मक चिंतनामध्ये ठेवण्याचा पुरुषार्थ करण्याची गरज आहे. आपल्या मनातील सकारात्मक विचारांमुळे आपला दृष्टिकोण सुद्धा सहजच सकारात्मक बनून जातो. सकारात्मक दृष्टिकोण हाच आपल्या जीवनातील सफलतेचा मूलमंत्र आहे. जीवनामध्ये अनुकूल प्रतिकूल परिस्थिती ह्या येतच राहतात. परंतु ज्यांचा दृष्टिकोण सकारात्मक असतो अशी व्यक्ती नकारात्मक वातावरणातही आपला उत्साह आणि विश्वासाबरोबर सकारात्मक सकाळची वाट पाहते. ज्याचे विचार नकारात्मक असतात अशी व्यक्ती उजेडामध्ये सुद्धा जणू काही अंधकारच अनुभव करू पाहते. आपल्या मनातील चालणारे विचार हेच सफलता किंवा असफलतेचे परिमाण आहेत. मनुष्य आपल्या मनामध्ये चालणाऱ्या विचाराप्रमाणेच आपले जीवन घडवू शकतो. विचार बीज आहेत. मनातील विचाराप्रमाणेच दृष्टिकोन, व्यवहार, कर्म, वृत्ति, दृष्टि बनून जाते. मनातील संकल्पाप्रमाणेच आपली सृष्टि सुद्धा बनते. ज्यांचे चिंतन सकारात्मक आशावादी असते तो नेहमी उत्साहामध्ये राहतो अशा व्यक्ती सहज सफल होतात. जीवनातील समस्याचे समाधान निराश होऊन नव्हे तर आशावादी आणि विश्वासपात्र बनून होईल. जर आपल्याला सफलतेच्या शिखरापर्यंत पोहचायचे असेल तर मग सकारात्मक विचारांचाच सहयोग घ्या. सकारात्मक विचारांमुळेच आपण विपरीत परिस्थिती मध्ये सुद्धा सुख, शांती, आनंद आणि प्रसन्न राहू शकतो हे एका उदाहरणावरून पटून येईल.

एका संन्याशाच्या जवळ एक खूप सुंदर आणि मूल्यवान घोडा होता. काही दुष्ट चोर लोकांची नजर त्या घोड्यावर होती. त्यांना वाटत होत की हा घोडा पळवला पाहिजे. एके दिवशी संन्यासी गाढ झोपेत असताना संधी साधून त्या दुष्ट चोरांनी तो घोडा चोरला. संन्यासी झोपेतून जेव्हा उठला तेव्हा त्यांना घोडा नजरेस आला नाही. संन्याशाने इकडे तिकडे शोधण्याचा प्रयत्न सुद्धा केला. ही

गोष्ट गावामध्ये सर्वत्र पसरली. गावातील अनेक लोक सहानुभूती दाखविण्यासाठी एकत्र येऊ लागले. परंतु संन्याशाच्या तोंडावर निराशाचे चिन्ह सुद्धा दिसून आले नाही. आश्रमामध्ये लोकांची खूपच गर्दी जमली गेली. तेव्हा संन्याशाने मिठाईचा डबा मागविला आणि आनंदाने मिठाई वाटू लागला, तेव्हा लोकांनी आश्चर्यचकित होऊन विचारले. ''महात्माजी तुमचा तर मूल्यवान घोडा चोरी झाला आहे आणि तुम्ही तर मिठाई वाटत आहात? तेव्हा संन्याशाने हसून उत्तर दिले'', माझे भाग्य होते म्हणून मी त्या घोड्यावर बसलो नव्हतो. नाही तर ते चोर घोड्यासोबत मला सुद्धा घेऊन गेले असते. मी आज या मोठ्या संकटापासून वाचलो याचा आनंद जाहीर करण्यासाठी मी ही मिठाई वाटत आहे.

ज्यांचे विचार सकारात्मक असतात अशी व्यक्ती विपरीत परिस्थिती मध्ये सुद्धा स्वतःला आनंदीत अनुभव करू लागतो. नकारात्मक विचार प्रतिकूल परिस्थिती मध्ये सुद्धा स्वतःला आनंदीत, सुखी, प्रसन्न अनुभव करू लागतात. जीवनातील प्रत्येक क्षेत्रामध्ये जर आपल्याला साफल्य प्राप्त करावयाचे असेल तर नकारात्मक विचारापासून नेहमी दूर रहा.

एका मल्टीनॅशनल कंपनीमध्ये दुपारच्या भोजनाच्या नंतर कर्मचारी जेव्हा ऑफिसमध्ये परत येऊ लागले तेव्हा फलकावर एक नोटीस लावलेली सर्वांच्या नजरेस आली. ती सर्वांनी पाहिली. नोटीशीत लिहिले होते - काल रात्री आपल्या सर्वांचा एक सोबती मृत्यू पावला आहे. जो मृत झालाय तो आम्हा सर्वांच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करणारा होता. तेव्हा त्या मृताला श्रद्धांजली देण्यासाठी हॉलमध्ये एकत्रित व्हावे. ही नोटिस पाहून सर्वजण आपसामध्ये चर्चा करू लागले, हा कोण होता? कोणी देह ठेवला! कोण आपल्या प्रगतीमध्ये बाधक होता? हॉलमध्ये त्या सोबतीला श्रद्धांजली देण्यासाठी सर्वजण एकत्रित होऊ लागले. हॉल गच्च भरला. स्टेजवरती एक मोठा पडदा लावला होता. त्यावर लिहिले होते मृत माणूस पडद्याच्या पाठीमागे आहे एक एक जाऊन तिथे त्याला श्रद्धांजली द्या आणि तिथूनच पाठीमागच्या दरवाजातून निघून जा.

कर्मचारी जेव्हा पडद्याच्या मागे जात तेव्हा तिथे मोठासा आरसा लावला होता. त्यामध्ये स्वतःची प्रतिमा दिसत होती. तुमच्या जीवनातील नकारात्मक विचारच अडथळा आहेत, हे आरश्याखाली लिहिले होते.

हॉलच्या बाहेर कंपनीचे अधिकारी उभे होते. ते सर्व कर्मचाऱ्यांचे स्वागत करत होते आणि त्यांना म्हणत होते आज तुम्ही स्वतःतील नकारात्मक प्रवृत्तीला समाप्त केले आहे, म्हणून आतापासून सकारात्मक विचारांच्या सोबत तुम्ही सफलतेच्या शिखरापर्यंत नेहमीच चालत रहा.

सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वर्तमान जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये असफलतेचे मूळ कारण म्हणजे नकारात्मक विचार. जर आपण आपल्या जीवनात साफल्य प्राप्त करू इच्छिता तर तुम्ही सुद्धा आजपासून आणि आतापासून आपल्या मनातील नकारात्मक विचारांना कायम स्वरुपाची श्रद्धांजली द्या. हे नकारात्मक विचारच आपल्या प्रगतीमध्ये बाधक आहेत. नेहमी तुम्ही सकारात्मक विचारांची कास धरा. सकारात्मक विचारच तुमच्या जीवनातील नव्हे, तर विश्वातील अंधकार दूर करतील. सकारात्मक विचारामुळेच नेहमी सुख, शांती, उमंग, उत्साह येत राहील. म्हणून बी पॉजिटिव्ह नेहमी सकारात्मक विचार करा.

***

(पृष्ठ क्र.१९ वरुन)

सुरूवात केली. एक ट्रक वाळू एक डंपर खडी शळी आणि ८० पोती सिमेंट जाग्यावर येऊन पडले. दहा मजूरांनी बारा दिवसात काम ओक्के केले काम पूर्ण झाल्यावर चार दिवसात पाऊसही सुरू झाला. माझ्या विहिरीची काळजी खरंच माझ्या शिवबाबाला आणि तुम्हाला सांगतो सगळे काम माझ्या मामेभावाने सदुसष्ठ हजारात पूर्ण केले. माझ्याजवळ मात्र फक्त सत्तर हजार रूपये होते.

क्रमशः

**शब्दांकन : ब्र.कु. प्रा. दिनेश डांगे**


***

(पृष्ठ क्र.२१ वरुन)

आम्ही सर्वजण जेवण वगैरे करून गावाकडे जाण्यासाठी तयार झालो जाण्यापूर्वी बाबांची आठवण करण्यासाठी थोडा वेळ शांत सर्वजण एकत्र बसलो माझ्या मनात मात्र बाबांसाठी एक ओळ आठवली

प्रेमळ, निर्मळ, शितळ भोळ्या मनाचा
निराकार आहे सद्गुरु माझा
हा तर त्रैलोक्याचा नाथ
करी पतितांना पावन
करी अज्ञान अंधकाराचा नाश!

***



# शिवबाबांचा चमत्कार

**ब्र.कु. शंकर, जालोर (राजस्थान)**

अध्यात्माविषयी ओढ असल्यामुळे आपणही राजयोग केंद्रावर जाऊन ज्ञान प्राप्त करावे असे नेहमी मनामध्ये येत असे. केंद्राविषयी ऐकीवात असलेल्या सर्व नकारात्मक बातम्यांवर विश्वास न ठेवता, साधारण तीन वर्षापूर्वी मी तेथे गेलो. तेथे निमित्त बहिणीने मला पहिल्या दिवसाचा पाठ शिकविला. आत्मा परमात्म्याविषयी खूप चांगल्या पद्धतीने समजावले. दुसऱ्या दिवशी कामामध्ये व्यग्र झाल्यामुळे केंद्रावर जाऊ शकलो नाही. एक वर्षानंतर यावेळी साप्ताहिक पाठ्यक्रम नक्कीच पूर्ण करीन, ह्या विश्वासाने पुन: राजयोग केंद्रावर गेलो. ह्यावेळेस एका दुसऱ्या निमित्त ब्रह्माकुमारी बहिणीने मला पहिल्या दिवसाचा धडा समजावला. दुसऱ्या दिवशी मी आणि माझी पत्नी दोघेही राजयोग केंद्रावर गेलो. आम्हांला बाबांविषयी सविस्तर माहीती दिली गेली. आणि असे आमच्या साप्ताहिक पाठ्यक्रमाची सुरुवात झाली. घरी आल्यावर माझ्या पत्नीने आजूबाजूंच्या महिलांबरोबर ह्याबाबत चर्चा केली; त्या महिलांनी तिला नकारात्मक विचारांनी भरून टाकले. ते ऐकून माझ्या पत्नीने केंद्रावर जाण्यासाठी मला एकदम नकार दिला. घरामध्ये कलह न होवो यासाठी मीही तेथे जाणे सोडून दिले.

२०१९ मध्ये मी सुरत (गुजरात) मध्ये ओशो शिबीरला गेलो होतो, तेथून परत येताना मी ब्रह्माकुमारी हसुमती दीदींना भेटायला त्यांच्या घरी गेलो. तेथे त्यांनी आपल्या घरी बाबांची खोली दाखविली, आणि शिवबाबांबद्दल विस्तृत माहिती खूप प्रेमाने सविस्तर सांगितले. त्यांनी मला शिवबाबांच्या ट्रान्सलाईट समोर बसायला सांगितले. मी ट्रान्सलाईट समोर बसलो आणि मला असे वाटले जणू चैतन्य रूपामध्ये शिवबाबा माझ्यासमोर बसले आहेत आणि मला आपल्याकडे बोलावत आहे. परत येताना दीदींनी मला शिवबाबांचे एक चित्र दिले. दीदींनी मला राजयोग केंद्रावर जाऊन शिवबाबांचे ज्ञान घ्यायला सांगितले. तेव्हा मी त्यांना माझ्या घरातील अडचण सांगितली. दीदी मला म्हणाल्या, ''शिवबाबा, खूप चमत्कारी आहे आणि एक दिवस तुमच्या घरीही ते चमत्कार करतील. जालोरमध्ये (घरी) आल्यावर मी बाबांचे चित्र माझ्या पिशवीतच लपवून ठेवले.

**जन्माष्टमीच्या दिवशी झाला चमत्कार**

वर्ष २०२१ जन्माष्टमीच्या एक दिवस आधी मी फिरत फिरत शिवबाबांच्या केंद्रावर मुलांना घेऊन गेलो. तेथे ब्रह्माकुमारी बहिणीने जन्माष्टमीच्या दिवशी मुलांना कृष्ण बनायला सांगितले. छोट्या मुलाने लगेच कृष्ण बनण्यासाठी होकार दिला. घरी आल्यावर मी पत्नीपुढे शिवबाबांच्या राजयोग केंद्रामध्ये जन्माष्टमीनिमित्त मुलांना कृष्ण बनवायची इच्छा जाहीर केली. तिनेसुद्धा लगेच होकार दिला आणि मलाही कार्यक्रमामध्ये घेऊन चला अशी इच्छा व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी जन्माष्टमीला मी दोन्ही मुलांना घेऊन शिवबाबांच्या केंद्रावर गेलो. तेथे माझा छोटा मुलगा ऋषभ ह्याला कृष्ण बनवले गेले. कृष्णाच्या रूपामध्ये तो इतका सुंदर दिसत होता. की, विश्वासच बसत नव्हता हाच तो ऋषभ आहे. मग मी माझ्या पत्नीला घ्यायला घरी आलो. ती म्हणाली, ''आज मी माझ्या मुलांच्या आनंदासाठी नक्की येणार. केंद्रावर आल्यावर ती एकदम बदलून गेली. आनंदाने फोटो घ्यायला लागली आणि सर्व बहिणींशी भेटू लागली. कार्यक्रमानंतर प्रसाद दिला गेला.'' निमित्त बहिणीने आम्हांला सांगितले की, तुम्ही सर्व जणांनी शिवबाबांच्या ज्ञानाचा साप्ताहिक पाठ्यक्रम करा, तर पत्नीने लगेच होकार दिला. घरी आलो तर घरातले संपूर्ण वातावरण बदलले होते. सर्वजण खूप खुश होते.

**साप्ताहिक पाठ्यक्रमाची सुरुवात झाली.**

जन्माष्टमीच्या चौथ्या दिवशी आम्ही दोघे बाबांच्या केंद्रावर गेलो आणि साप्ताहिक पाठ्यक्रमाची सुरुवात झाली. माझी पत्नी घरी सकाळच्या वेळेला ऑनलाईन मुरलीसुद्धा

ऐकायला लागली. शिवानी दीदींचे प्रवचन सुद्धा ऐकायला लागली. आधी ती छोट्या छोट्या गोष्टींवर रागवायची. आता ते सगळे बंद झाले होते. आमच्याबरोबर दोन्ही मुले सुद्धा ह्या पाठ्यक्रमाचा अभ्यास करू लागली. घरातील सर्व कामे आरामात व्हायला लागली. अगोदर जी घरातील कामे २च्या सुमारास सुद्धा व्हायची नाहीत ती आता १० वाजताच आनंदाने पूर्ण व्हायला लागली.

**मिळाले नवे जीवन**

सात दिवसांचा पाठ्यक्रम कधी पूर्ण झाला ते कळलेच नाही. साप्ताहिक पाठ्यक्रमाचा अभ्यास करताना ज्या आनंदाचा अनुभव झाला तो आजपर्यंत कुठल्याच अभ्यासामधून मिळाला नाही. ह्या सात दिवसामध्ये जे काही शिकायला मिळाले ते एकदम नवीन होते. आजपर्यंत शिवबाबा, आत्मा, परमधाम, मुरलीचे महत्त्व इ. जे कधीही माहीत नव्हते ते सर्व शिकायला मिळाले. आता विचार येतात, आतापर्यंत कुठले आयुष्य आपण जगत होतो ? एवढे हे सुंदर शिवबाबांचे ज्ञान आहे, ज्यामुळे आमचे जीवन इतके सरळ, सुखमय आणि शांतीपूर्ण झाले. दिनचर्येमध्ये सुद्धा बदल दिसू लागले आहेत. आता प्रत्येक काम वेळेवर घडू लागले आहे. आधी ह्या ज्ञानासाठी वेळही मिळत नव्हता; पण आता सकाळ-संध्याकाळ आपोआप वेळ मिळायला लागला आहे. सकाळची सुरुवातच शिवबाबांबरोबर होते आणि रात्री झोपेपर्यंत ती सोबत कायम राहत. मुलांनाही चांगले संस्कार मिळत आहेत. मुले दररोज सकाळी सात वाजता आंघोळ करून शिवबाबांच्या केंद्रावर जातात. दररोज मुरलीचे अध्ययन होत असल्यामुळे पूर्ण दिवस चांगला व्यतीत होतो. शिवबाबा आम्हां सर्वांची खूप काळजी घेतात. प्रत्येक क्षणी आम्हांला आनंदीत ठेवतात. संकटांपासून आमचे संरक्षण करतात. खूप खूप धन्यवाद बाबा ! खूप खूप धन्यवाद !

**(भावानुवाद ब्र. कु. संगीता, ठाणे)**

***

## बाबा, परत येशील का?

जीवनात आलास, मल्हार रागासारखा
बेसूर जीवांचे सुरेल गाणे करत
आता कुठे सुरांशी नाते जुळले
आणि तू निघून गेलास....
सांग परत येशील ना ?

रखरखत्या माळावर अंकुर उगवलेस,
आषाढ घन होऊन बरसलास,
इवल्याशा रोपाला तरुत बदललेस,
पान अन् पान बहरून आले,
आणि तू निघून गेलास....
सांग परत येशील ना ? ....

नीरस जीवनात उत्सवाचे फूल फुलले
सुखाचे रंग उधळत आलास,
सौख्याच्या लाटेवर आता कुठे नाव तरली,
आणि तू निघून गेलास....
सांग परत येशील ना ?....

दुभंगलेल्या मनाचा अभंग झालास,
पंखांना वात्सल्याचे आभाळ दिसेल
आता कुठे उडायला लागले,
आणि तू निघून गेलास....
सांग परत येशील ना ?....

**ब्र.कु. छाया, मुलुंड (पूर्व)**

(परमात्मा शिवाच्या भेटीचा आनंद गुलजार दादीजींच्या द्वारे होत असे. दादीजींच्या देहत्यागानंतर साकार रूपातील मिलन आता दुरापास्तच झाले. शिवपित्याच्या भेटीची ती हुरहूर या काव्यातून व्यक्त केली आहे.)

(पृष्ठ क्र.२२ वरुन)

शिवलिंगाच्या रूपाने शिवबाबा (परमात्मा) यांचे पूजन गायन करतात. पण त्याच परमात्मा यांच्यांशी संबंध जोडू ते अतींद्रिय सुख प्राप्त करण्याचा अनुभव काही जगावेगळाच! मित्र नेहमी मार्गदर्शन, साथ, योग्य मार्ग दाखविणारा, ज्ञान देणारा असतो. आणि शिवबाबांनी नेहमी मला ह्या सर्व गोष्टी मित्र म्हणून दिल्या. बरे हा मित्र असा आहे की जी कोणत्याही परतफेडीची अपेक्षा करत नाही. फक्त स्वच्छ मन, बुद्धी, स्वच्छ प्रेम, स्वच्छता (पवित्रता) हाच त्याच्याशी मैत्री करावयाच्या गोष्टी. ह्याच गोष्टींच्या आधारे आपण शिवबाबांशी मैत्री करू शकतो.

***

# प्रश्नोत्तरे

(भाग १)

ब्र.कु. सूरज, आबू रोड



**प्रश्न :** जीवनात चमत्कार कसा घडवता येईल ?

**उत्तर :** आज मी मनाच्या शक्तीबाबत काही गोष्टी सांगू इच्छितो.

**अर्धजागृत मनाची शक्ती**

आज मी तुम्हाला अंतर्मनाच्या शक्तींबद्दल माहिती देणार आहे. अंतर्मनाच्या ह्या अगाध शक्तीला कशाप्रकारे सकारात्मक पद्धतीने वापरता येईल, ह्याबद्दल काही गोष्टी थोडक्यात सांगणार आहे. तुम्हाला कुणाचे विचार, वाईट संस्कार जर बदलायचे असतील, त्यात सकारात्मक परिवर्तन आणायचे असेल, कुणाची दारू, सिगारेटसारखी व्यसनांतून मुक्ती करायची असेल, कुणाशी शत्रुत्व संपवून मैत्री करायची असेल, बिघडलेली, अर्धवट राहिलेली कामं पूर्ण करायची असतील, तर ह्या सर्व गोष्टींसाठी काय बरं उपाय करता येईल ? कुणावर कर्जाचा डोंगर असतो, कुणाचे पगार वेळेवर आणि पुरेसे होत नाहीत, पैशांची चणचण जाणवत असते. तर काय उपाय करता येईल यावर - सकाळी उठताच परमेश्वराचे अगदी निर्मळ मनाने, प्रेमाने आभार व्यक्त करा. आभार व्यक्त करणे (Gratitude) खूप मोठी गोष्ट आहे. तुमच्या जीवनात तुम्ही जे काही सध्या उपभोगत आहात त्याबद्दलही ईश्वराचे आभार माना. जसे छोट्या छोट्या गोष्टींबद्दल विचार करा - घरात सोफा आहे. त्यामुळे तुम्हाला खूप आराम वाटतो. धन्यवाद म्हणा. तुम्ही आज दोन वेळेला पोटभर जेवू शकता त्याबद्दलही प्रकृतीचे आभार माना. अन्नदाता परमेश्वर आणि त्या परमेश्वरी दूताचे शेतकरी बांधवाचे धन्यवाद! अशा छोट्या गोष्टींबद्दल आभार माना.

सकाळी उठताच विचार करा - मी परमेश्वराचा पुत्र आहे / पुत्री आहे (संतान) त्याची पवित्र नजर माझ्यावर आहे. त्याने माझ्या भाग्याची द्वारे ---- सर्व बाजूंनी उघडली आहेत. मी अति भाग्यवान, अति धनवान आत्मा आहे मी कर्जमुक्त आहे - असे संकल्प उठताच ७ वेळा करावे.

कुणी तुमचे उधार घेतलेलले पैसे समजा देत नसेल तर अशाप्रकारचे दृश्य बघा - तो माणूस पैसे किंवा चेक घेऊन येतोय आणि मला साभार परत करतोय. त्यासाठी एखादी वेळही निश्चित करा (कल्पनाचित्र पाहण्यासाठी) दिवसातून २-३ वेळा हे करा. तसेच त्याही माणसाचे आभार व्यक्त करा की माझे पैसे परत केलेत, खूप धन्यवाद. अशा प्रकारे ते धन परत मिळण्याआधीच त्याचे आभार व्यक्त करा आणि म्हणा तुम्हालाही योग्य ते धन मिळो, तुम्हीही सुखी व्हा धनधान्यांनी भरपूर व्हा.

जर कुणाचे संस्कार, विचार बदलायचे असतील, - तर सर्वात प्रथम त्याला शरीर नव्हे आत्मिक स्वरुपात बघायचा अभ्यास करा - मग तो भले तुमच्यापासून दूर असो, की जवळ - सर्वशक्तीमान शिवबाबांकडून सर्वशक्ती घेऊन त्याला तशा प्रकारच्या सूक्ष्म शक्तीशाली तरंग पाठवा. ५ मिनिटं, ७ मिनिटं, १० मिनिटं जेवढा वेळ शक्य असेल. तेवढा वेळ करा. मग त्याच्याशी मानसिक संभाषण करावयास सुरुवात करा - 'तू तर माझा खूप चांगला मित्र आहेस रे. आपल्या दोघांना एकमेकांबद्दल खूप प्रेम वाटते. आपण आपला हा जीवन प्रवास प्रेमाने, एकमेकांना मदत करत, मान देत, आनंदाने, मजेत करूया, ये बरं मित्रा, आपण आपल्या जीवनाचा आनंद घेऊया. एकमेकांशी प्रेमाने व्यवहार करुया..... ह्या प्रकारे जसे काही तुम्ही त्याच्याशी समोरासमोर बोलताय... रोज करा हे २१ दिवस तरी करू शकता.

कुणी व्यसनाधीन आहे खूप दारू पिताय - कॅन्सर झालाय, कुणाची मूत्रपिंडे खराब झाल्यात, हार्ट अटॅक येतोय... अशा व्यक्तींसाठीही आपण श्रेष्ठ संकल्प करू

शकता. तेवढाच विश्वास असावा की, माझ्या ह्या संकल्पांमध्ये एवढी शक्ती आहे, ती व्यक्ती नक्की सुधारेल तरच त्याचा योग्य तो परिणाम दिसून येईल.

अशा प्रकारे तुम्ही दुसऱ्यांच्या भावना अथवा काही गैरसमज झाले असतील, तुमच्याबद्दल कुणाचे तर ते ही दूर करू शकता - तर ही आहे संकल्प शक्तीची जादू - चमत्कार जे असंभव ही संभव करू शकते. (फक्त त्यावर तुमचा विश्वास असायला हवा)

***

## भावपूर्ण श्रद्धांजली



राजयोगिनी ब्रह्माकुमारी रंजनबेन

राजयोगिनी ब्रह्माकुमारी रंजनबेन यांनी ५ जानेवारी २०२३ रोजी ठीक तीन वाजता आपला नश्वर देह त्याग करून ईश्वराच्या सानिध्यात पोहोचल्या. हसतमुख, प्रेमळ, निर्मळ मनाच्या, स्वच्छ आणि उदार भावनेच्या ईश्वरी सेवेमध्ये निरंतर स्वतःला रममाण करणाऱ्या, ईश्वरी सेवा हीच सर्व श्रेष्ठ सेवा असं म्हणणाऱ्या रंजनबेन यांच्या लौकिक जन्म ७ ऑगस्ट १९५२ रोजी, मुंबई येथील घाटकोपर शहरात झाला. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांना ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले आणि त्यांनी स्वतःचे संपूर्ण जीवन ईश्वरी सेवेसाठी वाहून घेतले. परमेश्वरावरील निश्चय, अथक सेवाभाव यामुळे पुढील ५५ वर्ष त्यांनी मुलुंड सब झोन येथील मुलुंड, भांडुप येथील सेवा केंद्रांमध्ये अखंड सेवा दिली.

राजयोगिनी ब्रह्माकुमारी गोदावरी यांच्या सान्निध्यामध्ये राहून त्यांनी अनेक वैशिष्ट्ये आत्मसात केली. सेवाकेंद्रावरती जे कोणी भाऊ बहीण येतील त्यांना त्या प्रेमानी ईश्वरी महावाक्ये ऐकवत. प्रत्येक बंधु भगिनींचे त्यांनी ईश्वरी ज्ञान अणि योगाद्वारे संगोपन केले. ज्ञानयुक्त, आत्मिक स्नेहयुक्त संगोपन करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. अशा या भोळ्याभाळ्या वृत्तीच्या रंजन बेन यांनी अल्पशा आजारामुळे ५ जानेवारी २०२३ रोजी दुपारी ठीक ३ वाजता आपला देह सोडला. अशा महान आत्म्याला, रंजन बेन यांना, मुलुंड सब झोनमधील अनेक केंद्रांमधील बंधु आणि भगिनीं कडून भावपूर्ण श्रद्धांजली.

सर्व प्राण्यांविषयी औदार्याचे वर्तन ठेवा.
दुःखितांविषयी अनुकंपा बाळगा.
सर्व प्राण्यांवर प्रेम करा.
कोणाचाही मत्सर करू नका.
दुसऱ्यांच्या दोषांकडे लक्ष देऊ नका.

– स्वामी विवेकानंद



ठाणे चेकनाका – महाशिवरात्री निमित्त आयोजित मेळ्याचे अवलोकन केल्यानंतर भाजपा प्रवक्ता भ्रा. अजित चव्हाण यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. सरला, वास्तूतज्ज्ञ ब्र.कु. संदीप



वाशी : शांती यात्रेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित पोलिस निरीक्षक भ्रा. कदम, डॉ. रतन राठोड यांना ईश्वरी भेटवस्तू दिल्यानंतर ब्र.कु. शीला.




पिंपरी पुणे : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना माजी महापौर भ्रा. संजोग वाघिरे, नगरसेवक भ्रा. संदीप वाघिरे, ब्र.कु. सुरेखा व अन्य मान्यवर



चिखली बुलढाणा : महाशिवरात्री निमित्त आयोजित यात्रेच्या शुभारंभी भाजपा जिल्हा अध्यक्ष भ्रा. अशोक अग्रवाल, डॉ. भ्रा. कैलास बियानी, ब्र.कु. सुरेखा व अन्य मान्यवर



जिंतूर : महाशिवरात्री निमित्त शिव ध्वजारोहण केल्यानंतर ग्रुप फोटोत डॉ. भ्रा. पंडित दराडे, डॉ. भ्रा. संतोष घुगे, माजी नगराध्यक्ष भ्रा. अनुप सोलंकी, ब्र.कु. सुमन, ब्र.कु. नंदा



रविवार पेठ (पुणे) : महाशिवरात्री निमित्त आयोजित कार्यक्रमात ध्वजारोहण केल्यानंतर प्राचार्य भ्रा. अविनाश ताकवले व ब्र.कु. रोहिणी

Registration No. : MAHMAR/2007/21914



शांतीवन (आबू रोड) : डॉ. प्रेम शर्मा यांनी लिहिलेल्या 'वर्ल्ड ऑफ पीस' गाण्याच्या अल्बमच्या प्रकाशनप्रसंगी राजयोगिनी ब्र.कु. जयंदी दीदी, ब्र.कु. डॉ. मृत्युंजय, ब्र.कु. आशा दीदी, गायिका ब्र.कु. डॉ. दामिनी, ब्र.कु. डॉ. दीपक हरके



चंद्रपूर : आमदार भ्रा. सुधीर मुनगंटीवारांकडून समाज गौरव पुरस्कार स्वीकारताना राजयोगी ब्र.कु. मृत्युन्जय, ब्र.कु. डॉ. बसवराज व ब्र.कु. कुंदा




ठाणे (पू) : शालेय विद्यार्थ्यांना महाशिवरात्रीचे रहस्य सांगताना ब्र.कु. सविता व व्यासपीठावर राजयोगिनी ब्र.कु. गोदावरी दीदी, समाजसेविका, ब्र.कु. वीणा भाटिया, ब्र.कु. मीनाक्षी, डॉ. आहुजा व अन्य



भांडूप (प) : महाशिवरात्री निमित्त आयोजित मेळ्याचे अवलोकन केल्यानंतर कमांडर सर्जन भ्रा. दीप कमल ठाकूर व वैदेही ठाकूर यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. लाजवंती




नागपूर : माइंड–बॉडी–मेडिसिन संमेलनाचे उद्घाटन करताना राजयोगिनी ब्र.कु. जयंती दीदी, ब्र.कु. रजनी, ब्र.कु. डॉ. बनारसी, ब्र.कु. डॉ. सचिन, डॉ. उषा रडके व अन्य



अंधेरी : BSES MG रूग्णालयाचे नूतनीकरण केलेल्या जनरल वार्डचे उद्घाटन प्रसंगी अमृता फडणवीस, ब्र.कु. योगिनी दीदी, ब्र.कु. मीरा, ब्र.कु. प्रतिभा, ब्र.कु. डॉ. दीपक हरके